# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price ₹ 3/-

# संवाद

|| स्वयमेव मृगेंद्रता ||

*मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।*
*सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।*

**Vol.-4** **Issue - 10** एप्रिल - २०१२ **April 2012**


## संपादकीय

**प्रिय सभासदमित्रांनो,**

याच महिन्यात आपण २०१२-१३ या नव्या आर्थिक वर्षात प्रवेश केला. प्रत्येक आर्थिक वर्षात आपण नव्या व वाढत्या 'कर'रूपी संकटांना सामोरे जातो. इंधनाची दरवाढ वाहतूक-खर्चात वाढ करते. अनेक वस्तूंवरील करात वाढ होते. या करवाढीला राज्यशासन आणि केंद्रशासन कारणीभूत असतात. त्यामुळे सामान्य जनतेला दैनंदिन जीवनातही वाढत्या महागाईचे चटके सहन करावे लागतात. अर्थात निवडणुका तोंडावर आलेल्या असतील तर हे कररूपी संकट शासनकर्ते राजकीय स्वार्थापोटी का होईना, पुढे ढकलतात आणि जनतेच्या प्रेमाचा आव आणतात. निवडणुका जिंकण्याचं ध्येय साध्य झालं की करवाढ जनतेवर लादली जाते. हे आता उघड गुपित झालेलं असून ते राज्यकर्त्यांच्या आणि जनतेच्याही अंगवळणी पडलेलं आहे. एका हाताने जनतेला काही सवलती द्यायच्या आणि दुसऱ्या हाताने वाढते कर लादून त्याच जनतेकडून त्याहून अधिक काढून घ्यायचे ही शासनकर्त्यांची नीती सामान्य जनतेलादेखील पुरेशी ज्ञात झालेली आहे.

वरील पार्श्वभूमीवर एका गोष्टीकडे वाचकांचे विशेष लक्ष आम्ही वेधू इच्छितो, ती म्हणजे सामान्य माणसाची 'जीवनेच्छा'- म्हणजेच जगण्याची इच्छा अत्यंत तीव्र व प्रबळ असते. म्हणूनच तो सर्वंकष स्वरूपाच्या महागाईला अर्थात मानवनिर्मित संकटांना तसेच दुष्काळ-महापुरासारख्या निसर्गनिर्मित संकटांनादेखील धैर्याने सामोरे जाऊन आणि ती संकटे पचवून पुढे वाटचाल करीत राहतो. ही सामान्य माणसाची असामान्य जीवनेच्छाच आमच्या दृष्टीने महत्त्वाची आहे, कारण तीच त्याला जीवन जगण्याचं बळ देत असते, संकटे पचवण्याचं सामर्थ्य देत असते. एकदा माणसाची जीवनेच्छाच संपुष्टात आली की माणूस आत्मघाताला-आत्महत्येला प्रवृत्त होतो. जीवन फुलवण्याचे सर्वच मार्ग खुंटले की माणूस जीवन संपवण्याचे मार्ग शोधू लागतो. आपल्या कृषिप्रधान देशातील शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या हा सर्व समाजाच्या चिंतेचा विषय बनलेला आपण पाहतो आहोत. भविष्यात या आत्महत्या थांबाव्यात यासाठी राज्यकर्त्यांनीच पुढाकार घेऊन ठोस उपाय योजावेत, सामान्य जनतेच्या सहनशक्तीचा अंत न पाहता जनतेला सुखाचे व सुरक्षिततेचे दिवस दाखविण्याचे व त्या दृष्टीने प्रामाणिक प्रयत्न करण्याचे कर्तव्य राज्यकर्त्यांनी पार पाडावे अशी आपण राज्यकर्त्यांकडून अपेक्षा करूया.

गेल्याच महिन्यात बुधवार दि. २१ मार्च २०१२ ला मुंबईत दादर येथील 'शिवाजी मंदिर नाट्यगृहा'त आपल्या सभासदांची मुंबई विभागाची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. त्याचवेळी बँकेच्या वतीने ग्राहकमेळावादेखील पार पडला. यानिमित्त आपले सुमारे एक सहस्र सभासद एकत्र जमले होते. त्यांच्या दृष्टीने हा आनंदसोहळाच होता. त्यावेळी जुन्या मित्र-मैत्रिणींच्या, सहकाऱ्यांच्या गाठी-भेटी झाल्या, एकमेकांच्या सुख-दु:खांची देवाण घेवाण झाली, परस्परांचं क्षेम-कुशल कळलं, जुन्या स्मृतींना उजाळा मिळाला, एकमेकांशी 'संवाद' साधला गेला. वार्षिक सभेच्या निमित्ताने होणारे स्नेहभोजन व स्नेहमेळावा या जमेच्या बाजू विचारात घेऊनच सभासद मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित राहतात आणि नवी ऊर्जा, नवा उत्साह, नवी उमेद घेऊनच आपापल्या घरी परततात. या वर्षीच्या मेळाव्यात एक उणीव मात्र सर्वांनाच जाणवली, ती म्हणजे आपले सर्वांचे अत्यंत लाडके नेते व मार्गदर्शक श्री. बी. जी. दांडेकर यांची अनुपस्थिती. आपल्या 'बाळ गणेशां'च्या मार्गदर्शक व प्रेरणादायी भाषणास आपण या वर्षीच्या मेळाव्यात मुकलो याची हळहळ अनेकांच्या बोलण्यातून व्यक्त होत होती. परंतु आम्ही सभासदांना दिलासा देऊ इच्छितो की प्रकृतिअस्वास्थ्याच्या कारणास्तव आपले 'बाळ गणेश' (बी.जी.दांडेकर महोदय) या मेळाव्याला उपस्थित राहू शकले नसले तरी ते लवकरच ठणठणीत बरे होतील आणि यापुढील मेळाव्यांतून त्यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शक बोल आपणास ऐकावयास मिळतील. धन्यवाद.

**- क्रांतिसेन रामचंद्र आठवले**
भ्रमणध्वनी - ९८६९९४७६९१

(We reproduce the Order passed by the Hon. Supreme Court on 12-03-2012)

**ITEM NO. 4 COURT NO. 4 SECTION X**

**S U P R E M E C O U R T O F I N D I A**
**RECORD OF PROCEEDINGS**

**WRIT PETITION (CIVIL) NO(s). 184 OF 2011**

**FEDERATION OF SBI PENSIONERS ASS.&ORS. Petitioner(s)**
**VERSUS**
**UNION OF INDIA & ORS. Respondent(s)**
**(With office report)**

**Date: 12/03/2012 This Petition was called on for hearing today.**

**CORAM :**
**HON'BLE MR. JUSTICE D.K. JAIN**
**HON'BLE MR. JUSTICE ANIL R. DAVE**

**For Petitioner(s) Mr. K.K. Venugopal, Sr. Adv.**
**Ms. Aswati, Adv.**
**Mr. Gopal Shankarnarayan, Adv.**
**Mr. Gulfeshan Javed, Adv.**
**Mr. E.C. Vidya Sagar,Adv.**

**For Respondent(s) Mr. Sanjay Kapur,Adv.**
**Mr. Nikhil Danak, Adv.**
**Ms. Shubra Kapur, Adv.**

**Mr. Ashok Bhan, Sr. Adv.**
**Mr. D.L. Chidananda, Adv.**
**Mr. B.K. Prasad, Adv.**

**UPON hearing counsel the Court made the following**

**O R D E R**

**Mr. Bhan, learned senior counsel appearing for the Union of India states that appearance on behalf of the Union of India shall be entered during the course of the day. He also prays for some time to file counter affidavit on behalf of the Union of India. Let the needful be done within four weeks. In the affidavit to be filed on behalf of the Union of India by a senior officer, it will be explained as to why in the first instance, the Union of India did not respond to the notice, stated to have been served on them on 1st September, 2011. Rejoinder affidavit, if necessary, may be filed within four weeks thereafter.**

**List thereafter.**

**[ Charanjeet Kaur ]** **[ Kusum Gulati ]**
**Court Master** **Court Master**

( We reproduce an extract of Federation General secretary's Report placed before the Annual General Body of the Federation at Ahmedabad held on 29-03-2012 regarding our case filed in the Supreme Court on 16th March 2011)

*******************************************

**Writ Petition No. 184 of 2011 filed in the Supreme Court :**

"On the eve of our last Annual General Body meeting held at Kochi, we passed through very anxious moments on the admission of our writ petition by the Supreme Court and certain clarifications were required by the Registrar, Supreme Court. These clarifications were furnished immediately on arrival at Kochi to our Advocate by e-mail. Our case is most just and with God's grace, the hearing held on 13-05-2011 was favourable to us. The Hon.ble Judges passed orders for the issue of notices under NISI rules to the Government, RBI and our Bank, thereby calling upon them to furnish their reply/ objections to our Writ Petition. The Dasti Notices as per order of Supreme Court were served on the Government, RBI and SBI during the first week of June 2011.

The above case was posted for hearing on the following dates before the Registrar's Court.

21.04.2011, 01.09.2011 and 02.11.2011

No reply from any of the Respondents was submitted before the above dates of hearing held by the Registrar's Court. This Court, therefore, posted the next hearing before the regular bench on 16.01.2012. Our Bank submitted its Counter Affidavit on 29-11-2011. The main objections of our Bank are :-

(i) The classification of pensioners as per the cut off dates of their retirement is not violation of Articles 14 and 21.

(ii) Our Bank provides us three retiral benefits as against only two by the Nationalized Banks.

(iii) There is no link between the industry level wage settlements and the revision of our pension.

(iv) Our Bank has the right to classify the pensioners on the basis of the dates of retirement and

(v) Our Bank does not have unlimited powers to fix our Pension Fund Rules, which can be amended only after consultation with RBI and prior approval of the Central Government.

All the objections raised in the Bank's counter affidavit were effectively in our Rejoinder Affidavit submitted on 11.01.2012.

At the hearing held on 16.01.2012, our Advocate pleaded before the Court that the appearance of Government of India is necessary, as only with the approval of the Government, our Pension Fund Rules can be amended. Shri.Harish Salve, Senior Advocate appearing on behalf of the Bank also supported this plea. Shri.Bhattacharyya, A.S.G. who was present in the Court Hall, possibly in connection with some other case, gave an assurance that the Union of India will respond to our writ petition. On the basis od his assurance, the Court provided an option to the Government to file its counter affidavit within four weeks and also permitted us to file our Rejoinder Affidavit within two weeks. The next hearing was posted to 12.03.2012.

At the hearing held on 12.03.2012, Shri.Bhan, Senior Counsel appeared on behalf of the Government and requested the Court to grant some more time to the Government for its reply. The Court has granted four week's time to the Government and another four week's time to us for our Rejoinder in its order dated 12.03.2012. (the Order is reproduced on page 2). The next date of hearing is listed on 02.07.2012, the first day of opening of the Supreme Court after summer vacation beginning from 12.05.2012. We shall furnish our Rejoinder reply, effectively countering the objections raised by the Central Government in its counter affidavit, expected to be filed as per the order of the Supreme Court. We did not press for the response from the RBI, as the Government is only responsible for the various discriminations caused to us.

## Shri. R. N. Godbole No More

We note with deep sorrow the sad demise of Shri.Ravindra Narahri Godbole, former Vice-President of our Pensioners' Federation and former General Secretary of the All India State Bank Officers' Federation, who succumbed to his prolonged illness of Parkinson on 9th April 2012 at Bangalore. He was undisputed leader of State Bank Officers' Federation for about three decades during which he mobilized officers' community to stand up against the oppressive attitude of the State Bank Management.

He was born on 14th June 1935 in Bijapur. But due to adverse circumstances he had to shoulder the responsibilities in his family and join our Bank as clerk immediately after matriculation. During his initial service period he completed his B.A. (Hon). He started his career as Trade Union activist when he joined Employees Union before he was promoted as Trainee Officer in the first batch in the early 1960s. Since then he devoted his life fully for the cause of officers' fraternity by joining Officers' Association. He became General Secretary of Officers' Federation very soon due to his ability to lead the movement. Especially during the Emergency he laid an example by defying his unjust transfer orders of Management due to which his absence from duty for about 20 months was treated as 'No Work - No Pay'. But this did not deter his mission to serve the officers' community which ultimately resulted in withdrawal of his Transfer order by Management with full wages. Not only this, he was allowed officially and was relieved by the Bank full time to work for the Federation. Due to his ability to negotiate favorable service conditions and at times tough stand during the negotiations with the Management during 4th, 5th and 6th Bipartite settlements, he could bargain for substantial improvements in the service conditions of the Bank Officers' in the country.

He also held the post of the Officer Director in State Bank of India for over one and half decade. He was a very good orator. He also started the "Officers' Cause", a house magazine of the State Bank Officers' Federation. He was the source of inspiration for thousands of cadre all over the country.

After retirement he became the President of Bangalore Circle Association and Vice-President of Pensioners' Federation of State Bank of India. Due to his sudden demise we have lost a veteran leader who dedicated his life for the cause of Employees' / Officers' community.

We pray almighty to give enough strength to his family to bear their personal loss and pray sincerely - "MAY HIS SOUL REST IN PEACE".

- Secretary, S.B.I Pensioners' Association (Mumbai Circle), Pune

*************************************************************

### अभिनंदनीय

कोल्हापूर येथील एक सभासद श्री. दत्तात्रय विनायक धर्माधिकारी यांना पुणे येथे भरलेल्या भारतीय टपाल खात्यातर्फे राज्यस्तरीय टपाल तिकिटांचे प्रदर्शन 'महापेक्स २०१२' मध्ये त्यांच्या 'युरोप' या विषयावरील टपाल तिकिट संग्रहास 'कास्य' पदक मिळाले. या प्रदर्शनास शंभरपेक्षा जास्त संग्रहकांनी भाग घेतला होता. गेली पन्नास वर्षे त्यांनी टपाल तिकिट संग्रहाचा छंद जोपासला आहे. सुयशाबद्दल असोसिएशनतर्फे श्री. धर्माधिकारी यांचे अभिनंदन!

**- सेक्रेटरी**

### अभिनंदनीय

आपले एक सभासद श्री. व्ही. एम. चांदोरकर ह्यांची नात कु. किमया पाणदरे (मुलीची मुलगी) हिला पिंपरी चिंचवड भागातील सर्व कॉलेजमधून प्रथम क्रमांकाने (एम.कॉम, प्रथम वर्ष) उत्तीर्ण झाल्याबद्दल इंदिरा कॉलेजने सुवर्ण पदक प्रदान केले आहे.

तसेच त्यांचा नातू आदित्य गुंफेकर (धाकट्या मुलीचा मुलगा) ह्यास राज्यस्तरीय आंतर शालेय कराटे चँपीयन स्पर्धेत पहिल्या क्रमांकाचे सुवर्णपदक मिळाले आहे. ह्या यशाबद्दल दोघांचेही पेन्शनर्स असोसिएशनतर्फे अभिनंदन!

**- सेक्रेटरी**

## State Bank of India Pensioners' Association Mumbai Circle, (Pune) Nagpur Zonal Sub-centre

Vakil's Bungalow
Congress Nagar,
Nagpur- 440012.
Tel : (0712) 2455404
Dt : 11th April 2012

### NOTICE

The Circle Managing Committee of the State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle), Pune at its meeting held on the 6th April 2012 has directed the undersigned to hold the **Annual General Body meeting of entire Nagpur Zonal Sub-centre** consisting all the11 Districts of Vidarbha Region for the purpose of conducting Elections of Office Bearers of the Nagpur Zonal Sub-centre as published on page No.17 of "Samvad" for the month of March 2012. Accordingly, it has now been decided to hold the **Annual General Body meeting of the Nagpur Zonal Sub-centre on Sunday, the 27th May, 2012 at 3.00. P.M.** at following Address.

**State Bank of India Zonal Office Nagpur Premises at**
**Sardar Vallabhai Patel Marg, Kings Way Nagpur-440001**

### AGENDA

1. To condole the death of Bank's Pensioners / Family Pensioners / Associate Members whose names have been reported to us / known to us. Members are requested to advise us the names and dates of death of members, if not in the list, to be read out at the time of AGM.
2. Secretary's Report for the year 2011 to be read.
3. Shri A.G.Deshpande, Election Officer, to request to start the Election Process for electing Office Bearers of Nagpur ZSC by secret Ballot as published on page No.17 of "SAMVAD" for the month of March 2012.
4. No other matter will be discussed in the meeting.

J.S.Vakil
Secretary.

**Note** : One-tenth (1/10th) of the total number of members on the Register as on 30th April 2012 shall constitute a quorum for the meeting and if a quorum is not formed within 15 minutes of the appointed time, the meeting will be adjourned and the adjourned meeting will be held on the same day at the same place after half an hour of the scheduled time of the meeting. No quorum will be necessary for the adjourned meeting

### अभिनंदनीय

आपले एक सभासद श्री. अच्युत पुरुषोत्तम जोशी ह्यांनी ज्योतिष शास्त्रातील पारंपरिक पद्धत व कृष्णमूर्ति पद्धतीच्या दृष्टीकोनातून विवाह, विवाह विच्छेद, पुनर्विवाह, पुनर्मिलन विषयावर एक प्रबंध लिहून 'अथर्व ज्योतिष विद्यापीठ ',पुणे ह्यांना सादर केला होता. सदर प्रबंध मान्य होऊन त्यांना विद्यापीठातर्फे विद्यावाचस्पती (डॉक्टरेट) ही पदवी बहाल करण्यात आली. श्री. अच्युत जोशी यांचे यशाबद्दल पेन्शनर्स असोसिएशनतर्फे अभिनंदन!

**- सेक्रेटरी**

## अभिनंदनीय

आपल्या अमरावती युनिटचे माजी सचिव श्री.यादव भोगावकर यांच्या पत्नी व अमरावती येथील विदर्भ शासकीय ज्ञानविज्ञान संस्थेच्या संचालिका डॉ.प्रभा भोगावकर यांना इ.स.२०११-१२ चा डॉ.जानकी अम्मल आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. इ.स.१९९२ पासून सदर आंतरराष्ट्रीय पुरस्कार 'एथनोबॉटनी' विभागात म्हणजे ग्रामीण व आदिवासी भागात राहणाऱ्या लोकांच्या वनस्पतीशास्त्र विषयातील प्रदीर्घ व दर्जेदार संशोधन करणाऱ्यास देण्यात येतो. हा पुरस्कार गेल्या २० वर्षात प्रथमच एका भारतीयच नव्हे तर आशियायी व्यक्तिस प्राप्त होत आहे. गेली २०-२२ वर्षे या क्षेत्रात डॉ.प्रभा भोगावकर संशोधन करीत आहेत.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली आत्तापर्यंत ११ विद्यार्थ्यांनी पी.एच.डी. पदवी मिळवी आहे व ५ विद्यार्थी त्यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करीत आहेत. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकांमध्ये सुमारे ६५ संशोधन लेख प्रकाशित झाले असून त्यांनी वेळोवेळी नोंदविलेल्या ७२ दुर्मिळ वनस्पतींची नोंद शासकीय स्तरावर नोंद करणारे पुस्तक 'व्याघ्रप्रकल्प' मेळघाट, जि.अमरावती या पुस्तकात झाली आहे. वनस्पतींच्या औषधी गुणांवर प्रकाश पाडणारे ४ संशोधन प्रकल्प त्यांनी यशस्वी पूर्ण केले आहेत. सध्या त्या 'राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, नवी दिल्ली' साठी एका औषधी वनस्पतींच्या प्रकल्पावर प्रमुख शोधकर्ता या नात्याने कार्य करीत आहेत. वरील पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील संशोधनासाठी शुभेच्छा.

– सेक्रेटरी

*****************

## अभिनंदनीय

अमरावती येथील सभासद श्री.विनायक डोंगरे यांची स्नुषा सौ.संपदा आनंद डोंगरे यांना 'संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती' तर्फे 'आचार्य' पदवी प्राप्त केल्याबद्दल सन्मानीत करण्यात आले. 'स्टडीज ऑन ॲंटिबायोटिक प्रोड्युसिंग ॲक्टीमोमायसिटीस फ्रॉम सलाईन बेल्ट ऑफ विदर्भ रिजन' हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. विदर्भातील खारपान पट्ट्यातील जमिनीमधून अतिशय प्रभावी प्रतिजैविके तयार करणारे तसेच जे मानवी व प्राण्यांच्या रोगजंतूंना नाहीसे करू शकतात अशा प्रकारचे संशोधन अमरावती विद्यापीठात प्रथमच त्यांनी सादर केले. याबद्दल सौ.संपदा यांचे हार्दिक अभिनंदन.

तसेच श्री.विनायक डोंगरे यांची नात कु.राधिका रविंद्र डोंगरे ही सातवीत आहे. तिने माध्यमिक शालेय शिष्यवृत्ती परीक्षेत महाराष्ट्रात ४८ वी, तर सोमलवार हायस्कूल निखालस, नागपूर येथून १८ वा नंबर पटकावून मेरिटमध्ये येण्याचा मान मिळवला, तसेच श्री.डोंगरे यांचा नातू चि.श्रीकर आनंद डोंगरे याला स्टेट लेव्हलच्या ॲबॅकस स्पर्धेत सुवर्ण पदक मिळाले. तो स्कूल ऑफ स्कॉलर, अमरावती शाळेचा विद्यार्थी आहे. कु.राधिका व चि.श्रीकर या दोघांचेही असासिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा.

– सेक्रेटरी

**********************

## अभिनंदनीय

आपले अकोला येथील एक सभासद श्री.मुरलीधर सरदेशपांडे यांचा श्री नरसिंह सरस्वती स्वामी संस्थान गुरु मंदिर, कारंजा-दत्त (जि.वाशीम) येथे सत्कार करण्यात आला. गुरुमंदिर, कारंजा संस्थानतर्फे प.पू.श्री.वासुदेवानंद सरस्वती टेंभे स्वामी महाराज ह्यांचे जीवन व कार्याविषयी एक प्रश्नपत्रिका सोडवून श्री.सरदेशपांडे यांनी सादर केली होती. त्या निमित्ताने त्यांना प्रमाणपत्र व बक्षिस देण्याचा कार्यक्रम अखिल भारतीय त्रिपुरी परिवाराचे संस्थापक इंदोरचे डॉ.बाबासाहेब तराणेकर ह्यांच्या शुभहस्ते व वासुदेवानंद सरस्वती प्रतिष्ठानचे एक सन्माननीय सदस्य व विदर्भातील संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ.वासुदेवराव चोरघडे यांचे उपस्थितीत करण्यात आला. श्री.सरदेशपांडे यांनी अतिशय कठीण अशी कर्दळीवनाची यात्रा नागपूर येथील श्री.अरुणकुमार पांडे यांचे सोबत पूर्ण केली. तसेच ते निवृत्तीनंतर ज्योतिषविषयक निःशुल्क मार्गदर्शन करतात. श्री.सरदेशपांडे यांच्या आध्यात्मिक मार्गावरील वाटचालीस असोसिएशनतर्फे हार्दिक शुभेच्छा.

– सेक्रेटरी

*********

## अनुकरणीय

आपले अमरावती येथील एक सदस्य श्री.अरविंद विश्वनाथ मेश्राम यांचे दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या अंतिम इच्छेनुसार त्यांचा मृतदेह अमरावती येथील 'डॉ.पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज' येथे शरीररचना शास्त्र विभागास त्याच्या पत्नी श्रीमती मंदाकिनी यांनी सामाजिक जाणिव ठेवून दान दिला. श्री.मंदाकिनी मेश्राम यांनी फार मोठे सामाजिक कार्य केले आहे व ते अनुकरणीय आहे.

– सेक्रेटरी

### विनोद

सासूबाई जावयास – ''रोज रोज दारू पिऊन येणाऱ्या माणसाबद्दल मला अजिबात सहानुभूती अथवा प्रेम वाटत नाही.''

जावईबापू – ''ज्याला रोज रोज दारू पिण्यास मिळते त्याला इतरांच्या सहानुभूतीची अथवा प्रेमाची गरजच राहत नाही.

**– वसंत धुपकर,** पुणे

# स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे

## औरंगाबाद झोनल सब्-सेंटर

वार्षिक सर्वसाधारण सभा - २०११-१२

## नोटीस

स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशनच्या औरंगाबाद झोनल सब-सेंटरची २०११-१२ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.२५-५-२०१२ रोजी सकाळी १० वाजता खालील ठिकाणी आयोजित करण्यात आलेली आहे.

ठिकाण : सुयोग मंगल कार्यालय, टाऊन सेंटर,
कनॉट प्लेस, सिडको, औरंगाबाद

## कार्यक्रम पत्रिका

१. दि.५-१२-२०१० रोजी झालेल्या मागील सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून मंजूर करणे.
२. मागील सभेनंतर मृत झालेल्या सभासदांना श्रद्धांजली वाहणे.
३. मागील सभेच्या तारखेनंतर ज्या सभासदांच्या वयास ७५ वर्षे पूर्ण झालीत अशांचा सत्कार.
४. उपस्थित मान्यवरांचे मार्गदर्शन.
५. मागील वर्षभरातील नवीन सभासदांचे स्वागत व वार्षिक जमाखर्चास मान्यता.
६. सभासदांसाठी खुली चर्चा / ऐनवेळचे विषय.
७. सन २०१२-१३ व २०१३-१४ या द्वैवार्षिक कालावधीसाठी विभागीय पदाधिकाऱ्यांच्या निवडणूका
८. अध्यक्षीय समारोप.

तरी औरंगाबाद झोनल सब-सेंटर कार्यक्षेत्रातील सर्व सभासद, सहसभासद व फॅमिली पेन्शनर सभासदांनी सभेस उपस्थित रहावे ही विनंती. सभासदांना वेगळी निमंत्रण पत्रिका पाठविण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

नागेश जोशी
दि.१२ एप्रिल २०१२ विभागीय सचिव

## विशेष सूचना

१) निवासाची व्यवस्था व इतर चौकशीसाठी श्री. एन्.के.जोशी (M) ९४२२२११४९२ **किंवा** श्री.सुरेश भोळे (M) ९८५०९५३८६६ यांचेशी संपर्क साधावा.
२) औरंगाबाद शहरातील शाखांतर्फे पेन्शनर्स मीट त्याच दिवशी सर्वसाधारण सभेनंतर आयोजित करण्यात येईल.
३) सन २०१२-१३ व २०१३-१४ साठी खालील विभागीय पदाधिकाऱ्यांच्या निवडणूका होतील.
   १) विभागीय अध्यक्ष, २) विभागीय उपाध्यक्ष, ३) विभागीय सचिव
   ४) सहसचिव, ५) विभागीय खजिनदार आणि ६ ) सेंट्रल कमिटी (१ पद)
   ७) औरंगाबाद, धुळे, जळगाव, नंदुरबार, अंमळनेर, नांदेड, लातूर, परभणी, बीड , उस्मानाबाद या युनीटचे प्रतिनिधि

***पान नं. १८ वरील कोड्यांची उत्तरे***

*१) वीस बोटांची नखे २) हाताचा पंजा ३) चार ४) शपथ ५) कंगवा ६) अंडे ७) मधाचे पोळ ८) पिठाची गिरणी ९) महिना रात्र दिवस १०) सावली ११) कात्री १२) गुलाबजामुन १३) पायजमा १४) कारंजे*

## List of Members who have given Donations during September 2011 to 31-03-2012

(Please refer earlier list published in Samvad for September 2011)

*****************************************************************************************

| NAME | AMOUNT |
|---|---|
| MR.S.V.NAIK | 15000 |
| MRS.PREETI KOTNIS | 11000 |
| SMT.SNEHALA P.DESAI | 10000 |
| MR.MADHAN PRABHU | 10000 |
| MR.MADHAN PRABHU | 8988 |
| MR.VASANT PARAB | 7501 |
| MR.SUDHAKAR PATHAK | 7501 |
| MR.B.L.PATWARDHAN | 7001 |
| MRS.ANURADHA JOSHI | 6151 |
| MRS.SWATI DESHMUKH | 6001 |
| MR.KALIDAS KULKARNI | 5201 |
| A WELLWISHER | 5001 |
| MR.VILAS V. | 5001 |
| MR.R.C.HANSOTIA | 5001 |
| MR.C.G.KIRTIKAR | 5001 |
| SMT.SHEELA P.LADE | 5001 |
| MR.ASHOK DESAI | 5000 |
| DESHMUKH | 5000 |
| MRS.PREETI KARNIK | 5000 |
| MRS.VIJAYA KARVE | 5000 |
| MRS.& MR.D.N.MADAN | 5000 |
| MANAKRAY G.MALKANI | 5000 |
| MR.PRAKASH R.PAWAR | 5000 |
| MR.K.M.SATHE | 5000 |
| MR.VISHWAS J.VARTAK | 5000 |
| MRS.ANURADHA B.WALVE | 5000 |
| MR.S.V.PAI BIR | 4000 |
| SMT.PATKI | 3600 |
| LESLEE B.D'SOUZA | 3000 |
| MR.HOMI DARUWALA | 3000 |
| SMT.PRATIBHA KAPADIA | 3000 |
| MR.T.S.NARAYANSWAMI | 3000 |
| MR.K.D.PANTHAKY | 3000 |
| MINOO N.SARKARI | 3000 |
| MR.P.M.VESUNA | 3000 |
| MR.R.S.ZUNZUNWALA | 2501 |
| SMT.NANDINI R.CHITNIS | 2500 |
| MR.S.G.HOSPATANKAR | 2500 |
| MR.SHRIVALLABH KHARANGATE | 2500 |
| MR.SHREEDHAR.C.LELE | 2500 |
| SMT.KALPANA A.SAWANT | 2500 |
| MR.K.A.KAMATH | 2111 |
| SBI DAHISAR PEN WELFARE ORG. | 2011 |
| SMT.ARNAVAZ GANDHI | 2001 |
| MINOO R.MISTRY | 2001 |
| MR.B.R.PANDIT | 2001 |
| K.P.SHYAMSUNDER | 2001 |
| MR.NOSHIR M.BHADA | 2000 |
| MR.UDAYCHANDRA DHURI | 2000 |
| MR.JEROME FERNANDES | 2000 |
| MR.N.S.PATEL | 2000 |
| MR.JAYANT T.POWALE | 2000 |
| MR.R.S.RAUT | 2000 |
| MR.NOUSHIR K.TANTRA | 2000 |
| MR.SURESH WARANG | 2000 |
| MR.P.M.GARKHEDKAR | 1650 |
| SMT.SUNITA BHAGWAT | 1501 |
| SMT.PRATIBHA M.DESAI | 1501 |
| MR.VASUDEO S.PAI | 1501 |
| MR.ASHOK J.DESAI | 1500 |
| MR.GANESH GURJAR | 1500 |
| MRS.MADHURI M.KHARE | 1500 |
| MR.D.S.GOKHALE | 1301 |
| MR.K.N.KURIL | 1125 |
| MR.G.L.JAMSANDEKAR | 1111 |
| MR.A.G.PHADKE | 1111 |
| MRS.SONAL N.SHAH | 1111 |
| MR.DEEPAK TALPADE | 1111 |
| SMT.SUDARSHAN CHECKER | 1100 |
| MR.P.V.DIGHULE | 1100 |
| MR.N.G.KHANDELWAL | 1100 |
| MR.C.R.PATANKAR | 1100 |
| MR.V.A.SONAGIRE | 1100 |
| MR.UMANATH N.MAHALE | 1051 |
| MRS.MARIA D'COSTA | 1001 |
| MR.D.S.GOKHALE | 1001 |
| MR.T.S.GOPALKRISHNAN | 1001 |
| MRS.UJJWAL KAISHAP | 1001 |
| SMT.VIJAYA V.KAMAT | 1001 |
| SMT.KANTA NADKARNI | 1001 |
| SMT.ANAGHA VIDWANS | 1001 |
| MRS.SUMALINI S.VIJAYKAR | 1001 |
| MR.S.BANDARKAR | 1000 |
| MR.BHASKAR CHAVAN | 1000 |
| MR.S.R.CHECKER | 1000 |
| MR.YASHWANT DABAKE | 1000 |
| MRS.SANYOGITA S.DAMLE | 1000 |
| SMT.SINDHUTAI R.DESHMUKH | 1000 |
| SMT.S.DESHMUKH | 1000 |
| SMT.NALINI K.DESHMUKH | 1000 |
| SMT.SHAILAJA DRAVID | 1000 |
| MR.JAYANT JOGLEKAR | 1000 |
| MR.A.D.JOJARE | 1000 |
| MR.B.P.KHARE | 1000 |
| MR.U.M.MASURKAR | 1000 |
| MR.VENUGOPAL NAIR | 1000 |
| MR.R.S.PADWAL | 1000 |
| MR.LAXMAN PATHAK | 1000 |
| MR.S.K.POTE | 1000 |
| MR.B.S.RANDIVE | 1000 |
| MR.PRABHAKAR ROTHE | 1000 |

| | |
|---|---|
| MR.G.V.SHINKRE | 1000 |
| SMT.S.TODKAR | 1000 |
| SMT.BHARATI YEDKE | 1000 |
| MR.D.W.LIMAYE | 751 |
| MR.MANOHAR MHATRE | 751 |
| MR.M.M.AMARSHETTAR | 700 |
| SMT.SHALINI A.KANADE | 600 |
| MR.HEMANT RAJE | 551 |
| MR.HARIKISAN BHATIA | 501 |
| MR.FRANK BRITO CRUZ | 501 |
| CHANCHAL R.DADLANI | 501 |
| SMT.NALINI DALAL | 501 |
| MR.V.V.DEOSTHALI | 501 |
| MR.V.N.JOGLEKAR | 501 |
| MR.S.D.JOSHI | 501 |
| MR.M.L.KHUNTE | 501 |
| MR.P.S.LAWATE | 501 |
| MR.PRAFULL MASTAKAR | 501 |
| MR.HARSHAD MODI | 501 |
| SMT.SUSHILA MODI | 501 |
| MR.S.B.MORE | 501 |
| MR.SHAMSUNDER MORVEKAR | 501 |
| MR.N.RAMCHANDRAN NAIR | 501 |
| MR.VIKRAM R.PANDIT | 501 |
| MR.N.R.SHETTY | 501 |
| MR.Y.R.UGALE | 501 |
| ALL INDIA CEN.GOVT.EMP.ASSN | 500 |
| SMT.MAHRUKH S.DEBOO | 500 |
| MR.RAJARAM GHORPADE | 500 |
| MR.M.Y.KANNAO | 500 |
| MR.P.D.KULKARNI | 500 |
| MR.SUDHAKAR D.KULKARNI | 500 |
| SMT.SHEELA PATWARDHAN | 500 |
| MR.MADHUKAR V.PRABHU | 500 |
| SMT.PRATIBHA S.SAMANT | 500 |
| MR.PRAKASH TAMBIRE | 500 |
| MR.JAGANNATH TENDULKAR | 500 |
| MR.D.K.UKANDE | 500 |
| SMT.RAMA D.KAKAIYA | 351 |
| MR.BABERWAL | 301 |
| MR.A.J.KINHIKAR | 300 |
| MR.R.H.PALASKAR | 300 |
| AMIR ILAHI ATTAR | 251 |
| MR.S.K.BHAGWAT | 251 |
| MR.V.K.MEHROTRA | 251 |
| MR.M.V.RAUT | 251 |
| SMT.VARSHA BAGAITKAR | 250 |
| MR.S.R.GULGULE | 250 |
| MR.K.D.PARADKAR | 250 |
| SMT.MUKUL PUNTAMBEKAR | 250 |
| MRS.PRADNYA P.RANDIVE | 201 |
| A WELLWISHER | 200 |
| MR.S.T.KHARAT | 200 |
| MR.S.V.MADNURE | 200 |
| MR.BHASKAR S.PETHE | 200 |
| MR.SURESH R.SALI | 200 |
| ABDUL RASHID SHAIKH | 200 |
| MR.D.H.JAMBHALI | 150 |
| MR.C.B.AMBEKAR | 101 |
| MR.S.NIMISHE | 101 |
| MR.B.K.BENDRIKAR | 100 |
| MR.M.D.DONGRE | 100 |
| SMT.SWATI S.JOSHI | 100 |
| MR.Y.G.KARANDIKAR | 100 |
| M.S.KRISHNMURTHY | 100 |
| MR.K.G.KULKARNI | 100 |
| MR.RAJKUMAR NEGI | 100 |
| MR.D.S.PAWAR | 100 |
| MR.ANANT RANE | 100 |
| MR.V.H.WADDEWAR | 100 |
| MR.R.S.WANI | 100 |

*****************************************************************

## Social Activity worth Emulating !!

Our Nanded city is developing under JNNURM SCHEME. Our State Bank colony formed one committee comprising our pensioner members and their family members named "Parijat Swatchhata Samiti". The samiti members have took active part in the "Clean City Campaign" of Nanded Municipal Corporation and gave a demonstration of 'wet' garbage converted in 'compost fertilizer' using waste water in the colony. Nanded Municipal Corporation has arranged one workshop with foreigners from Nairobi, England etc. for this purpose.

Housewives from our society - Mrs Snehal Kanchalwar, Mrs.Rohini Deshpande, Mrs.Rupali Sharma, Mrs.Namita Kulkarni, Mrs.Vidhya Borikar, Mrs.Shobha Kundkar and other 20 women had arranged a 'Stall' at the workshop with 'SBI Banner'

This social activity shows that our SBI Pensioners and their Family members are also active in social work. Foreigners were also impressed by this activity and in this way our State Bank's name along with Nanded Corporation will be ahead in the list of other nations in the world. We are proud to be associated with such type of social work.

***- S.R.Kanchalwar,***
***Nanded***

## पुस्तक - परिचय

ठाणे येथील आपले एक ज्येष्ठ सदस्य श्री.हरी सदाशिव भाटे ह्यांनी लिहिलेले 'पट आठवणींचा' हे आत्मचरित्र आपल्या मुंबई झोनल सब-सेंटरच्या शिवाजी मंदिर येथील दि.२१ मार्च २०१२ रोजी आयोजित केलेल्या वार्षिक सभेत आपले अध्यक्ष श्री.व्ही.एम.गोखलेसाहेबांचे हस्ते प्रकाशित झाले. ह्या आत्मचरित्रास मा.श्री.बी.जी.दांडेकर यांनी प्रस्तावना लिहिली आहे. तसेच श्री.व्ही.एम.प्रभुदेसाई यांनी लिहिलेल्या परिचयात्मक लेखाचा समावेश या पुस्तकात आहे.

भाटेकाका हे आमचे बँकेतील सहकारी. ५ नोव्हेंबर १९५७ रोजी बँकेत ते वॉटरमन म्हणून रुजू झाले. व सहा महिन्यातच त्यांना पदोन्नती मिळून ते शिपाई या पदावर पोहोचले. अतिशय सरळ स्वभावाचे व सडेतोड व्यक्तिमत्व. सत्याची कास धरणारे. कोणी दांभिकतेने वागलं तर त्यांना पटत नसे. मात्र एखाद्याशी विचार जुळले की मग मात्र त्याच्यासाठी कांहीही करायची तयारी. वागण्यातील सचोटी, परिपक्वता अगदी लहानपणापासूनच आहे हे त्यांचं चरित्र वाचल्यावर लक्षात येते. त्यांची जन्मभूमी इंदौरची. जडणघडणही इंदौरचीच. म्हणूनच जन्मगावाशी त्यांची नाळ एवढी जोडलेली आहे कीं, सध्या त्यांच्या पायाच्या आजाराला देखील औषध लागू पडतेय ते तेथील डॉक्टरांचेच.

लहानपणापासूनचा त्यांचा खडतर प्रवास वाचल्यावर मन विषण्ण होतं. डोळे सतत भरून येतात. नशिबाने तब्येतीची साथ त्यांना कमीच लाभली आहे. त्याचबरोबर आर्थिक चणचण आणि अगदी लहान वयातच वडिलांचे छत्र गमावलेले. हे वाचून मन अगदी हेलावून जाते. पण कुशाग्र बुद्धी, कष्टाळू व सकारात्मक वृत्तीचं दान मात्र परमेश्वराने त्यांच्या पदरात भरभरून टाकलं आहे. हे पुस्तक वाचतांना त्यांच्या तीव्र स्मरणशक्तीची प्रचिती येते. ६वीत असतांना गेलेल्या शाळेच्या ट्रीपचं वर्णन वाचल्यावर मी त्यांना विचारलं 'एवढ्या लहानपणापासून तुम्ही रोजनिशी लिहीत होतां कां?' त्यावर त्यांचं 'नाही' हे उत्तर ऐकल्यावर मी थक्कच झाले. लहानपणी त्यांना झालेल्या अपघातामुळे त्यांचं शालेय वर्ष वाया गेलं याची खंत जशी त्यांना वाटली हे लिहितांना, त्यावेळेस मिळालेल्या व अजूनही टिकून राहिलेल्या मित्रांचा उल्लेख करण्यास व त्यामुळे मिळालेला आनंद लिहिण्यास ते विसरले नाहीत. कष्टाळू व प्रामाणिक स्वभावामुळेच आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर अतिशय चांगली माणसंही त्यांना मिळाली. बँकेतही माननीय श्री.गद्रेसाहेब, श्री.हरवथेसाहेब, श्री.रानडेसाहेब अशी कितीतरी नांवे घेता येतील. 'बालपणीचा काळ सुखाचा' त्यांच्या वाट्याला फारसा आला नाही. अनेक नोकऱ्या केल्या. वडिलांना दिलेले वचन पाळण्यासाठी कांही वेळेस संधीही गमवावी लागली. पण ना खंत, ना खेद. अती कष्ट व उपासमार यामुळे अल्सर, रक्तदाब, हृद्रोग, पायाचं दुखणं असे आजार त्यांच्या वास्तव्याला आले. पण त्यांची आध्यात्मिक बैठक खूप घट्ट, गणेशयाग व गायत्री याग केल्याने त्यांची बायपासही टळली हे पाहून डॉक्टरही थक्क झाले. 'रुद्र' हा शब्द आपण ऐकलेला. पण त्यांनी ३ वेळा अतिरुद्र, ८ वेळा महारुद्र केला. तसंच ६ वेळा सोळा सोमवाराचे व्रत असे अनेक धार्मिक विधि करून त्यांनी स्वतःबरोबर अनेकांना पुण्य दिले. याचे सर्व श्रेय ते परमेश्वर तसेच वाडवडिलांनाही देतात. आध्यात्माचा हा वारसा त्यांचे पणजोबा 'हरी रामचंद्र भाटे' ह्यांच्याकडून झिरपत आला आहे. त्यामुळेच त्यांना वेळोवेळी साधूंचे दृष्टांतही होत गेले व त्याची प्रचितीही आली.

जीवनाचा खडतर प्रवास, इतकच नव्हे तर त्यांच्या पत्नीचे अकाली निधन ह्या सर्वांची सांगड ते गतजन्मातील कर्माशीच लावतात व परमेश्वराशी लीन होतात. आयुष्यातील गैरसोय हीच सोय मानून वाटचाल करतात. अर्थात या प्रवासात त्यांना शांत व गुणी मुलांची, मुलीची व जावयाची साथ आहेच. ह्या ईश्वरी भक्तीमुळेच त्यांच्या उर्वरीत आशा, आकांक्षा, अपेक्षा नक्कीच पूर्ण होतील.

संपूर्ण आत्मचरित्र वाचल्यावर माझ्या मनात भाव उमटले -

***आध्यात्माचे लेवून लेणे, खाण ती खोदली !***
***निज आयुष्य लढाया तयांना, स्फूर्ती मिळाली नवी !!***

- सौ.सुलभा आरोसकर, ठाणे

## *प्रतिक्रिया*

'संवाद' मार्च २०१२ प्रभाकर गुपचूप यांच्या संपादकीया संबंधी आलेल्या काही प्रतिक्रिया

१) संपादकीय वाचले. अत्यंत वाचनीय असेच आहे. अभिनंदन.

- **व्ही. आर. पुणेकर,** पुणे

२) 'संवाद' मार्च २०१२ मधील संपादकीय अतिशय उत्तम व सर्वस्पर्शी असेच आहे. अनुभवातून उत्तम जीवनविषयीची शिकवण प्रभावीपणाने मांडली आहे. अभिनंदन.

- **चंद्रकांत केसरकर,** डोंबिवली

३) 'संवाद' मार्च २०१२ मधील संपादकीय उत्तम आणि अत्यंत वाचनीय असेच आहे. अभिनंदन.

- **अनिल खाडीलकर,** पुणे

## The Eighteen Golden Principles of Stress-free Living

- There are always some advantages in every wayof life. Think over those advantages repeatedly.
- Don't feel sorry about mistakes done in the past, past is a ghost . Also don't worry about future which has not yet born. So, make the present positive and creative.
- Don't compare yourself with others. You are a unique person in this world.
- Don't feel jealous of others, be contented.
- Don't feel superior to others, give up the ego. This world is a huge drama. Don't feel anxious by observing scenes of sorrow and tragedy.
- When you are suffering from illness and facing problems, think that you are paying your debts of past actions, so be happy about it.
- Spare time to help others, thereby your worries will be forgotten.
- Don't to solve many problems at a time. Open only one compartment and put maximum efforts.
- If you can't solve a problem, despite all efforts, don't be unhappy. God and time are the best healers.
- Consider your critics as your well wishers. By describing your weaknesses, they are acting as a psychotherapists without charging any fees. Also don't critise others at their back.
- Don't think of taking revenge. Forgive and forget.
- Surrender all your worries to God and relax.
- Have a positive attitude towards day to day events.
- Give happiness to others, never think of giving unhappiness.
- Check your mental traffic by observing your mind. It will be stop producing unwanted thoughts.
- Laughter is an antidote of stress. Laugh on your mistakes, but not on other's please.
- Practice meditation for fifteen minutes daily. It will bring peace, bliss and relaxation of mind and body.

- ***by Shamlal Sharma,***
SBI, Manager (Retd), Jammu

(Courtesy - "S.B.I.Pensioners' Mail", February 2012 issue of monthly magazine of Pensioners' Association, Chandigarh Circle).

## आयुष्य

बालवयात मार्ग होता सरळ
भरपूर प्रकाश, स्वच्छ दृष्टी
पण चालताच यायचं नाही
आईच्या कडेवरून पाहिली
जमेल तेवढी सृष्टी ।।१।।

बालपणी पाहिलेल्या वाटेला
तारुण्यात फुटल्या अनेक वाटा
संभ्रम, गोंधळ यात समजेना
कोणती आपली वाट ।।२।।

इथेही बाप्पा पुन्हा आला
एक वाट दाखवून म्हणाला
हीच वाट तुला झेपेल
इथेच तुला सोबतही मिळेल ।।३।।

मिळाली दिशा, मिळाली सोबत
मार्ग होता रूंद, प्रकाश पुरेसा
चालता बराच मार्ग सरला
अन् हा पुढचा चौरस्ता आला ।।४।।

संसाराचे चढउतार अनुभवताना
झडलेले केस, वाढलेले पोट सावरताना
उमगलंच नाही, आयुष्याची
संध्याकाळ कधी झाली ।।५।।

आजवर कधी तू एकटं मला सोडलं नाहीस
खात्री आहे मला
इतिश्री होईपर्यंत
माझी साथ तू सोडणार नाहीस ।।६।।

**- श्री. अरुण तुळजापूरकर, पुणे**
भ्रमणध्वनी - ९८९०२२६१५४

## Change your Words, Change your World

After retirement I started learning and using computer and now I am using few computer applications including typing 'Devanagari' which is useful for writing / editing matter for 'SAMVAD'. I am also using 'Internet' for getting glimpse of the knowledge in various fields. I am having 'Face-book' account where I regularly visit my friends, relatives and we interact with each other. Recently, when I was browsing through my 'face-book' account, I came across few humorous video-clips posted on my face-book account by "www.videofy.me" website. Everyday, the website posts new video 'links' containing funniest 'pranks' as also 'interesting' clips for entertainment. Some are thought-proving also. One such thought-provoking clip "Change your words, Change your world" was posted recently on my face-book account which I found interesting. What was in it, which found me 'Interesting & Thought-provoking'?

The title of the video-clip is :

**" It's a Beautiful Day and I can't see "**

When I opened the video-clip (http://www.videofy.me/alimehdi/306780) I found that a blind beggar was sitting on a piece of card-board by the road side with an empty begging-bowl and a sign-board written on it " I am Blind. Please Help". Very few passers-by noticed him and threw some coins in front of him. He was 'sensing' the foot steps of the 'donors'. On hearing the sound of coins being thrown at him, he was waving his hand at the direction where the donors walked away in token of having thanked them . The collection was very meagre and the beggar appeared to be nervous.

After some time, one passer-by lady saw him and stopped for a while to read the sign-board. She then quietly lifted the sign-board and written some thing on the back of it and placed beside the beggar again. Before she left, the beggar touched her feet. She then left without uttering a single word to him. Beggar sensed some thing but could not understand what the lady had done to his sign-board. Thereafter, it was surprise for the beggar that many passers-by were putting coins in his begging bowl which became half-full during the day. He appeared to be happy. In the evening, the same lady was returning and she stopped in front of him. The beggar touched her feet and could sense & recognize immediately that she was the same lady who had done something to his sign-board. He asked her curiously, "What did you do to my sign?" She replied with compassionate voice - " I had written the 'same' but changed few words" and she left. Beggar immediately thanked her by waving his hand at her. She had written -

" It's a Beautiful Day and I can't see it ". These words touched the good sense of all the passers-by and induced them to donate some-thing. What's the power in well arranged 'words' - written or spoken to the World around us, isn't it ?

So, CHANGE YOUR '**WORDS**' & CHANGE YOUR **WORLD** !!

- ***R.N.Lalingkar***, Pune.
(M) 09822107988

(P.S. : Interested members may visit the web-site by typing the address in the browser as **www.videofy.me/alimehdi/306780** and press 'enter' key & see for themselves the video-clip narrated above)

### विनोद

मोरूला ऑफिसमधून घरी जाण्यास उशीर झाला होता व बायकोची बोलणी ऐकायला नको म्हणून तो घाईत निघाला. रस्त्याच्या कडेने एका इमारती खालून जात असताना त्याला आवाज ऐकू आला. ‘‘थांब पुढे जाऊ नकोस. वरून एक फुलाची कुंडी खाली पडत आहे.’’ मोरू ते ऐकून थोडा मागे झाला आणि खरोखरच वरून एक कुंडी खाली पडून त्याच्या जवळच फुटली. तो पुढे चालत येवून चौकातून रस्ता ओलांडणार तोच त्याला पुन्हा आवाज आला, ‘‘मागे हो! विरूद्ध दिशेने मोटार सायकल जोरात येत आहे’’ मोरू थोडा मागे झाला आणि काय आश्चर्य एक मोटार सायकल त्याच्या अगदी जवळून गेली. मोरूने न राहवून आवाजाच्या दिशेने विचारले, ‘‘तू मला सूचना देणारा आहेस तरी कोण?’’ आणि आवाज आला, ‘‘तुझा हितचिंतक तुला सावध करण्यास आलो आहे.’’ तेव्हा मोरू म्हणाला, ‘‘मग माझ्या लग्नाच्या वेळी कोठे होतास?’’

- **गोपाळ वि. मुळे**, भ्रमणध्वनी - ९८९०८६३८६९

## Save the Indian Rupee !

You can make a huge difference to the Indian economy by following few simple steps. Please spare a couple of minutes here for the sake of India. Here's a small example :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Before 12 months | | 1 US $ | = | IND Rs 39/- |
| After 12 months, | now | 1 US $ | = | IND Rs 50/- |

Do you think US economy is booming? No, but Indian economy is going down. Our economy is in your hands....

Indian economy is in a crisis. Our country like many other ASIAN countries is undergoing a severe economic crunch. Many Indian industries are closing down. The Indian economy is in a crisis and if we do not take proper steps to control it, we will be in a critical situation.

More than 30,000 crore rupees of foreign exchange are being siphoned out of our country on products such as cosmetics, snacks, tea, beverages, etc... which are grown, produced and consumed here?

A cold drink that costs only 70 / 80 paise to produce is being sold for Rs 9 and a major chunk of profits from these are sent abroad. This is a serious drain on Indian economy.

We have nothing against multinational companies, but to protect our own interests, we request everybody to use Indian products only at least for the next two years. With the rise in petrol prices, if we do not do this, the Rupee will devalue further and we will end up paying much more for the same products in the near future.

**What can you do about it ?**

1. Buy only products manufactured by wholly Indian companies.
2. Enroll as many people as possible for this cause.....

Each individual should become a leader for this awareness. This is the only way to save our country from severe economic crisis. You don't need to give-up your lifestyle. You just need to choose an alternate product.

All categories of products are available from wholly Indian companies. For example :

**Cold drinks**

Drink lemon juice, fresh fruit juices, chilled lassi (sweet or sour), butter milk, coconut water, jal jeera, enerjee, and masala milk instead of Coca cola, Pepsi, Limca, Mirinda, Sprite

**Bathing Soap**

Use Cinthol & other Godrej brands, Santoor, Wipro Shikakai, Mysore Sandal, Margo, Neem, Evita, Medimix, Ganga , Nirma bath & Chandrika instead of Lux, Lifebuoy, Rexona, Liril, Dove, Pears, Hamam, Lesancy, Camay, Palmolive

**Tooth Paste**

Use Neem, Babool, Promise, Vico Vajradanti, Prudent, Dabur Meswak instead of Colgate, Close up, Pepsodent, Cibaca, Forhans, Mentadent.

**Tooth Brush**

Use prudent, Ajanta , Promise instead of Colgate, Close up, Pepsodent, Forhans, oral-b

**Shaving Cream**

Use Godrej, Emami instead of Palmolive, Old spice, Gillete

**Blade**

Use Supermax, Topaz, Lazer, Ashoka instead of Seven-o -clock, 365, Gillette

**Talcum powder**

Use santoor, gokul, cinthol, wipro baby powder, boroplus instead of Ponds, Old spice, Johnson's baby powder, Shower to shower

**Milk powder**

Use Indiana, Amul, Amulya instead of Anikspray, Milkana, Everyday milk, Milkmaid.

**Shampoo**

Use Lakme, Nirma, Velvette instead of Halo, All clear, Nyle, Sunsilk, Head and Shoulders, Pantene

**Mobile connections**

Use Reliance, Tata instead of Vodafone

**Food Items**

Eat Tandoori chicken, Vada Pav, Idli, Dosa, Puri, Uppuma instead of Kfc, Macdonald's, Pizza Hut, A&W

Every Indian product you buy makes a big difference. It saves India. Let us take a firm decision today. **Buy Indian to be Indian** - We are not against any of the foreign products. We are not anti-multinational. **We are trying to save our nation**. Every day is a struggle for a real freedom. We achieved our independence after losing many lives. They died painfully to ensure that we live peacefully. The current trend is very threatening. Multinationals call it globalization of Indian economy. For Indians like you and me, it is re-colonization of India. The colonist's left India then. But this time, they will make sure they don't make any mistakes.

Who would like to let a "goose that lays golden eggs" slip away ? Please remember: political freedom is useless without economic independence. Russia, S.Korea, Mexico - the list is very long !! Let us learn from their experience and from our history. Let us do the duty of every true Indian.

Finally, it's obvious that you can't give up all of the items mentioned above. So give up at least a few items for the sake of our country !

We would be sending useless forwards to our friends daily. Instead, please forward this message to all your friends to create awareness.

**"Little drops make a great ocean."…Please try to be an Indian.. Be proud to be an Indian !**

- B. K. Ghosh, Kandivali (East), (M)09967882941
- A.K.Kulkarni, Andheri (East), (M) 09324685434

**************************************************************************

## अभिनंदनीय

आम्ही काही पेन्शनर्स, घरोंदा या हेल्पर्स ऑफ हॅन्डीक्राफ्टच्या उचगांव (कोल्हापूर) येथील कार्यालयात भेट द्यायला गेलो होतो. तेथील स्वच्छ वातावरण व शिस्त बघून खूप बरे वाटले. पाय नसतील तर हाताने चालणारी व हात नसतील तर पायाने लिहिणारी मुले अपंग असूनही जिद्दीने शिक्षणासाठी धडपडणारी मुले, मुली बघितली.

आपले पेन्शनर श्री. आर. डी. गुप्तेसाहेब मुलांना शिकवताना येथे दिसले. ते बघून आम्हाला खूप आनंद झाला. डेप्युटी जनरल मॅनेजर या उच्च पदावरून मुंबईहून निवृत्त होवून ते कोल्हापूरात स्थिरावलेत.

या अपंग मुलांना शिकवण्यासाठी गुप्तेसाहेब गेले वर्षभर, विना मोबदला, स्वत:च्या गाडीने येवून शिकवत आहेत. त्यांना श्री. सदानंद फडणीस हे बँकेतील पेन्शनर साथ देत आहेत.

निवृत्त झाल्यावर कुरकुरणारे अनेक पेन्शनर्स असतात पण गुप्ते साहेबांनी निवृत्त माणसांना खरंच एक चांगला आदर्श घालून दिलाय.

**- रत्नाकर रामचंद्र कुलकर्णी**
भ्रमणध्वनी - ९४२१२०७४७६

# हृदयातील प्रकाश

स्वत:च्या काय किंवा दुसऱ्याच्या काय हृदयातील प्रकाश प्रत्येकाला दिसेलच असे नाही. पण मी खात्रीने सांगतो की तो असतो मात्र नक्की!!! ज्याला दिसला तो भाग्यवान आणि न दिसणाऱ्याला तो लवकर पाहता यावा अशी इच्छा.

आमच्या सूनबाईंना आणि नातवाला तिच्या माहेरी म्हणजे उत्तर प्रदेशातील झाशीला घेऊन गेलो होतो. पंधरा दिवस तेथे पाहुणचार घेऊन मी आणि सौ. आम्ही परत रेल्वेने झाशी ते रत्नागिरीच्या परतीच्या प्रवासात होतो. माझा मोबाईल चार्ज करण्यासाठी समोरील Compartment मध्ये गेलो आणि तेथे असलेल्या वयस्क बाईंना त्यांची परवानगी घेऊन मोबाईल चार्ज करत ठेवला. एक तासाने मोबाईल परत आणण्यासाठी गेलो तेव्हा त्या बाईंचे यजमानही बाजूच्या सीटवर चिंतातूर बसलेले पाहिले. त्यांना थँक्स म्हणून मी परतणार तेवढ्या त्यांनी विचारले की, ''आता पुढचे स्टेशन कोणते आहे आणि किती वेळ लागेल?'' हरियानवी हिंदीमधून विचारलेल्या प्रश्नांना हिंदीमध्येच उत्तर दिले की, ''आता पुढचे स्टेशन चिपळूण येईल.'' त्यांनी पुन्हा प्रश्न विचारला की, ''त्या स्टेशनवर एखादे 'कफ सायरप' मिळेल का?'' कारण त्यांच्या सौं.ना काल रात्रीपासून श्वासाचा खूपच म्हणजे अतोनात त्रास होत होता आणि त्यामुळे त्या अत्यंत बेचैन झाल्या होत्या. मी त्यांना आदल्या रात्री दरवाज्याच्या पायरीवर हवेवर बसलेले आणि नंतर परत येऊन झोपलेले पाहिले होते, पण कारण समजले नाही. मी त्यांना म्हणालो की, ''स्टेशनवर इथे औषधाची दुकाने नसतात.'' ते गृहस्थ आणखी चिंतेत वाटले. पण लगेचच माझ्या एक गोष्ट लक्षात आली. त्यांना मी सांगितले की, ''तुमच्याच जवळ बसलेल्या एका स्त्रीने सकाळी सामान भरताना बॅगमध्ये एक लहान बाटलीदेखील भरताना मी पाहिले आहे. परंतु ते हेअर ऑईल होते की दुसरे काही ते मला माहीत नाही. पण एवढ्या प्रवासात तुमची ओळख झाली असली तर त्यांना विचारायला काही हरकत नाही.'' सकाळी त्या जोडप्याने आपले सामान बांधून जवळच्याच कंपार्टमेंटमध्ये मुक्काम हलवला होता. परंतु यात वेळ घालवण्यापेक्षा माझ्याकडे ज्या पाच-सहा आल्याच्या वड्या होत्या त्या घेऊन मी त्या बाईंना द्यायला गेलो. यजमानांनी त्यातली वडी खाण्यासाठी सौं.ना आग्रह केला परंतु परक्या माणसाने दिलेले खावे किंवा न खावे याचा कदाचित त्यांना विचार पडलेला दिसला. मी त्यांना वडीमध्ये काय काय आहे ते सांगितले. ''तुम्हाला वाटले तर तुम्ही वडी खा नाहीतर माझा आग्रह नाही.'' असे निक्षून सांगितल्यावर त्यांनी फक्त अर्धी वडी खाल्ली. उरलेल्या मी पुन्हा परत आणून माझ्या जागेवर बसलो. पुन्हा थोड्या वेळाने मी चौकशीकरता गेलो त्यावेळी त्यांनी सांगितले की जी मी वडी दिली होती ती खाल्ल्यावर, त्याने कमालीचा गुण आला आणि धाप लागून होणाऱ्या श्वासाचा मागमूसही उरला नाही. एव्हाना तब्येत खडखडीत झाली होती. मी त्यांना उरलेल्या वड्या दिल्या आणि सांगितले की, ''या वड्या म्हणजे आत साखर आणि आले आहे. कफ सायरपमध्ये आणि काय जास्त असते? त्याने श्वसनाला चांगली मदतच होईल! तुम्हाला अजून मंगलोर पर्यंत जायचे आहे तेव्हा अनमान करू नका. त्या वड्या तुमच्याकडेच असू देत. गरजेला उपयोगी पडतील.'' त्यांनीही मग आढेवेढे न घेता त्या ठेवून घेतल्या. मी सांगितल्याप्रमाणे नंतर त्यांनी शेजारी चौकशी केली आणि काय नवल? त्यांना शेजारच्या जोडप्याकडून 'कफ सायरप'ची बाटलीसुद्धा मिळाली. इतकेच नव्हे तर त्या माणसाकडे रक्तदाब पाहण्याचे मशीनही होते. कदाचित ते डॉक्टर असावेत!! त्याचा उपयोग करून सर्व काही ठीक आहे हे समजले. कफ सायरप घेण्याची जराही गरज पडली नाही.

एक दीड तासांनी रत्नागिरी स्टेशन आले आणि मी माझी रोलिंग बॅग ओढत दरवाज्याकडे नेली. त्या बॅगेवर सौ.ला लक्ष ठेवायला सांगून दुसरी बॅग आणण्यासाठी वळणार तोच ते गृहस्थ माझ्या मागोमाग येत म्हणाले, ''तुमच्या राहिलेल्या बॅगा आणि इतर सामान मी घेऊन येतो. तुम्ही सामान उचलण्याची दगदग अजिबात करायची नाही'' आणि सर्व सामान त्यांनी आमच्याजवळ दरवाज्यात आणून ठेवले. अनपेक्षित मदतीने मी अगदी भारावून गेलो. स्टेशन यायला अजून दहा-पंधरा मिनिटे होती. म्हणून ते जरा बोलू लागले. म्हणाले, ''काल रात्री मी देवाचे एक पुस्तक माझ्या सौ. ला श्रद्धेने वाचून दाखवत होतो.'' मी म्हटले की, ''तुमचे वाचन मीही लक्षपूर्वक ऐकत होतो.'' ते म्हणाले, ''त्यात लिहिल्याप्रमाणे मला लगेच दाखला मिळाला की परमेश्वर तुमच्याजवळच आहे पण तुम्ही त्याला ओळखले पाहिजे.'' ते पुढे अतिशय भावुक होऊन म्हणाले की, 'त्याची अनुभूती मला इतक्या लगेचच मिळेल असे जराही वाटले नव्हते.'' असे म्हणून त्यांनी आमच्या पायावर हात ठेवून कृतज्ञतेने नमस्कार केला. मला खूप अपराध्यासारखे वाटले कारण तेही चांगले वयस्कर असून आम्हा दोघांना वाकून नमस्कार केला हे काही बरे वाटले नाही. मी त्यांच्या खांद्याला धरून त्यांच्या वाकण्यास थांबविण्यास असफल प्रयत्न केला पण त्यांनी आमच्या पायाला स्पर्श केलाच!!

एवढे करून ते गृहस्थ आपल्या जागेवर जाऊन बसण्याऐवजी म्हणाले की, ''तुम्ही दोघे खाली उतरा मी तुमचे सर्व सामान खाली उतरवून देतो आणि गाडी पुन्हा चालू होईपर्यंत

जेवढे अंतर ते सामान मला पुढे आणून देता येईल तेवढे देतो.'' या क्षणी अचानक माझे डोळे पाण्याने भरून तर आलेच पण नकळत आलेला हुंदका मला आवरला नाही. मला वाटले केवढे निर्मळ मन या माणसाला देवाने दिले आहे? Purity of mind is so evident? माझ्या प्रती त्यांना परमेश्वराची अनुभूती मिळावी हीही एक प्रकारे माझ्यावर असलेली परमेश्वरी कृपा नव्हे काय? सर्वच अद्भूत आणि अविश्वसनीय!!!

**- दत्ता नाफडे,** रत्नागिरी

भ्रमणध्वनी - ०९८९०८६०५४८

## लग्नानंतर

कालपर्यंत बरं होतं, स्वातंत्र्य अबाधित होतं
केव्हाही या केव्हाही जा, विचारणारं कोणी नव्हतं
कालपर्यंत बरं होतं

स्वातंत्र्य अबाधित होतं, झोपायची वेळ नव्हती
उठायचं बंधन नव्हतं, पसारा आवरणं,
मी सोडून, इतरांचंच काम होतं
कालपर्यंत बरं होतं

आज सारं चित्रच पालटलं
झोपून उठायच्या आत, आवरावं लागतं,
'बेड टी' तू घेणार का? मलाच विचारावं लागतं.
कालपर्यंत बरं होतं

अहो ऐकलंत का....?
कालपर्यंत बरं होतं दिवसाची सुरवात होते
आठच्या आत घरात, बिनबोभाट यावंच लागतं
कालपर्यंत बरं होतं

जाताना डबा घेऊन जा, अन्न तेवंढ झाकून ठेवा
ऑफिसातून येताना, पिक्चरची दोन तिकिट आणा
जेवण बाहेरच घेऊ या म्हणते
सूचनांचं पालन करावंच लागतं.
कालपर्यंत बरं होतं

**- अरूण सावरकर,** मुंबई

भ्रमणध्वनी - ९८९२८१२८३८

## अशा आठवणी

बँकेतील अडतीस वर्षांच्या सेवा काळातील विविध शाखांमधून कामे करीत असताना अनेक प्रसंग, अनेक आठवणी मनात साठवून ठेवलेल्या असतात. बँकेत येणाऱ्या विविध स्तरातील ग्राहकांच्या मिश्कील वा विनोदी स्वभावांचे दर्शन होत असते. असेच काही प्रसंग.

१) कोल्हापूरातील माझ्या सुरवातीच्या काळात, कोल्हापूर या एकुलत्या एक शाखेत, सरकारी कामाकाजाचाही खूप बोजा असे. चलन रूपाने येणारा सरकारी भरणा व विविध सरकारी खात्यांची पेमेंटची बिले, बिले घ्यायला येणारी सरकारी कारकून मंडळी वा शिपाई बहुधा ठरलेली असत त्यामुळे ती चांगलीच परिचीत असत. त्यांच्या सोबत हास्य-विनोद ही होत असत.

सार्वजनिक बांधकाम विभागाचा एक शिपाई त्यांच्या खात्यातील पगार, भत्ते, बिलाचे पेमेंट नेण्यासाठी नेहमी येत असे. त्याचे पूर्णनाव होते 'बाबू ईस्माइल गवंडी'. तो कमी शिकलेला, प्रामाणिक व अत्यंत विनोदी स्वभावाचा होता. तो बिलावर फक्त त्याच्या अद्याक्षरात सही करायचा. म्हणजे तो फक्त 'बा. ई. ग.' असे लिहायचा. त्यावेळी सरकारी पेमेंटवर श्री. शेणकी म्हणून कॅशियर होते. ते ही स्वभावाने थोडे मिश्कील होते. कधी कधी लहर लागली की ते बाबू ला बायकी आवाजात ''बा ई ग! ये ग! तुझे पेमेंट घे!' बाबु पण मग ''आलेऽऽ आले होऽऽ म्हणत लचकत मुरडत चालत येत आणि मध्येच थांबून मान वेळावत ''आले म्हटलं नं, एवढी कसली घाई बाई?'' उत्स्फूर्तपणे घडणाऱ्या या प्रासंगिक विनोदाने, रांगेत तिष्ठत असलेले सर्वच हास्य रसात डुंबून जात व मनावरचा ताण कमी होई.

दुसरा असाच एक प्रसंग आठवतो. म्हणतात ना बोलणाऱ्याची माती खपते न बोलणाऱ्याचे सोनेही पडून राहते. उद्यमनगर शाखेतील हा एक प्रसंग. दोन लघुउद्योजक होते. त्यांचे खाते अपुऱ्या पत पुरवठ्यामुळे बऱ्याच प्रमाणात अनियमीत झाले होते. जे पार्टनर बँक व्यवहार बघत होते ते थोडे गंभीर व अबोल स्वभावाचे होते. रिजनल मॅनेजर शाखेत आले असताना त्यांनी त्या खात्याच्या चौकशीसाठी दोघाही पार्टनर्सला बोलाविले व त्यांच्या अनियमित खात्यासंबंधी चौकशी सुरू केली. बँकेचे नियम व बाजू मांडली. त्यांना उत्तर देताना दुसरे पार्टनर हे अत्यंत बोलके व हजरजबाबी होते. चर्चेदरम्यान ते आर.एम. साहेबांना म्हणाले, ''आपल्या बँकेने आर्थिक मदत केली म्हणून आम्ही उद्योग उभा करू शकलो त्याबद्दल धन्यवाद! पण साहेब बँकेची चादर उबदार आहे. पण ती लहान मुलाची आहे. ती आम्ही डोक्यावर घेतली तर पाय उघडे पडतात व पाय झाकले की डोके उघडे पडते.'' आम्हाला पुरेल अशी चादर द्या! अत्यंत प्रभावी शब्दात त्यांनी 'अंडर फायनान्स' हा मुद्दा मांडला व थोड्या दिवसात योग्य लिमिट मिळवून उत्तम उद्योग केला.

**- विनायक शं. कुळकर्णी,** कोल्हापूर

दूरध्वनी - ०२३१-२६२०१९२

# बनावट लॉटरी किंवा बक्षिसाच्या योजना

जानेवारीच्या सुरुवातीला मुंबई पोलिसांनी इंटरनेट व मोबाईलद्वारे लोकांना फसवणाऱ्या एका नायजेरियन टोळीला अटक केली आहे. अशा इतरही टोळ्या काम करीत असून अनेक लोकांची फसवणूक झाली असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवलेली आहे.

यासंबंधी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (रिझर्व्ह बँक) यांचेकडे चौकशी केली असता, रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी वर्तमानपत्रातून लोकांनी आपली फसवणूक करून घेऊ नये म्हणून सूचना दिल्या आहेत.

तुमच्या मोबाईलवर एस एम एसद्वारे किंवा ई-मेलद्वारे तुम्हाला मोठी लॉटरी लागली आहे किंवा मोठे बक्षीस तुमच्या मोबाईल नंबराला लागले आहे असे कळविले जाते आणि या रकमा नेहमी डॉलर किंवा पौंडामध्ये कित्येक कोटी रूपयांपर्यंत असल्याचे या संदेशात म्हटले जाते. काही वेळा रिझर्व्ह बँकेच्या बनावट लेटरहेडवर बनावट सह्यांनी रिझर्व्ह बँकेकडे पैसे ठेवल्याबद्दल पत्रे येतात. अशा प्रकारे कोणताही पैशाचा व्यवहार रिझर्व्ह बँक करीत नसल्याबद्दल रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी खुलासा केला आहे.

तुमच्या बँक अकाऊंटची माहिती रिझर्व्ह बँकेला कळवावी असा मेल तुम्हाला येतो. प्रत्यक्षात ही माहिती फ्रॉड करणाऱ्यांकडे जाते व त्याचा दुरूपयोग करून तुमच्या खात्यातले पैसे काढले जातात. अशी अकाऊंटबद्दलची कोणतीही माहिती रिझर्व्ह बँक मागवीत नसते असा स्पष्ट खुलासा रिझर्व्ह बँकेने केला आहे. तरी आपल्या अकाऊंट संबंधी कोणालाही माहिती देऊ नये असेही रिझर्व्ह बँकेने सांगितले आहे.

बनावट मेसेज पाठवणारे सुरवातीला छोट्या छोट्या रकमेची मागणी करतात. प्रोसेसिंग/ट्रँझॅक्शन फी टॅक्स क्लियरन्स चार्जेस, कनव्हर्जन चार्जेस, क्लियरिंग चार्जेस अशी कारणे देऊन सुरवातीला पैशाची मागणी करतात. हे फ्रॉड करणारे विविध बँकात बनावट नावाने खाती उघडतात किंवा काही वेळा काही खातेदारांना कमिशनचे आमिष दाखवून त्यांच्या खात्यात हे पैसे जमा करतात व असे पैसे जमा झाले की ते ताबडतोब काढून घेतात.

एकदा तुम्ही या व्यक्तिच्या जाळ्यात सापडला म्हणजे आणखी पैशाची मागणी केली जाते व बघता बघता तुम्ही काही लाख रूपये पाठवून बसता.

शाळा, हॉस्पिटल अशा संस्थांना सुद्धा अशा तऱ्हेच्या ऑफर्स येतात. यात अशा संस्थांची फसवणूक होण्याची जास्त शक्यता असते.

रिझर्व्ह बँकेने स्पष्ट खुलासा केला आहे. फॉरिन एक्सचेंज कायद्याप्रमाणे लॉटरी किंवा बक्षिस किंवा तशा प्रकारच्या स्कीममध्ये भाग घेण्यासाठी परदेशी पैसे पाठविण्यास पूर्णपणे बंदी आहे.

बनावट लॉटरी किंवा बक्षिस योजनांना आपण बळी पडू नये. तसेच आपले मित्र कुटुंबीय किंवा आपण काम करीत असलेल्या सामाजिक संस्था यांना पण सावधगिरीचा इशारा द्यावा.

**विशेष सूचना -**

बनावट लॉटरी व बक्षिस प्रकरणी फसवणूक झाली असता पोलिसात किंवा पोलिसांच्या सायबर क्राईम सेलकडे तक्रार दाखल करता येते.

**- मो. ना. दांडेकर,**
नाशिक

## मोहात गुंतलो मी

(चाल - रूपास भाळलो मी)

मोहात गुंतलो मी — संसार सोडवेना
तुजला विनंती देवा — येथेच राहू दे ना

हा लाडका छकुला — म्हणे खेळ खेळू दोघे
खेळात रंगलो मी — मज खेळ मोडवेना ।।१।।

म्हणते माझी राणी — जग सर्वही पाहावे
किती पाहिले तरीही — हौस तिची फिटेना ।।२।।

लेखक कवी म्हणुनी — मजला मिळे प्रसिद्धी
कादंबरी मनीची — अपुरीच राहते ना ।।३।।

माझ्या मनात होती — रम्य गूढ कविता
वाचा तिला फुटावी — ही आस राहिली ना ।।४।।

सुंदर किती प्रपंच — भरला असे सुखाने
भरला घडा सुखाचा — हातीच राहू दे ना ।।५।।

**- श्री. गजानन गोपाळ अराणके, पुणे**
भ्रमणध्वनी - ९८८१०६१४१३

# अमीर खुस्रो

१३ व्या शतकात अमीर खुस्रो या नावाचा तुर्की वंशाचा एक महाकवी होऊन गेला. त्याचे मूळ नाव अबुल हसन होते, पण तो अमीर खुस्रो या नावाने प्रसिद्ध झाला. खुस्रो हा जन्मजातच शायर होता.

जलालुद्दीन खिलजीच्या दिल्ली दरबारात खुस्रो एक विद्वान म्हणून ख्यातनाम होता. सुफी संत निजामुद्दीन अवलिया हे त्याचे गुरू होते. दिल्लीत अनेक सुलतानांनी राज्य केले. अशा सात सुलतानांच्या काळात अमीर खुस्रो त्यांच्या दरबारात एक विद्वान म्हणून कायम राहिला.

तो उत्तम शायर तर होताच. पण त्याचबरोबर उत्तम गायक व संगीततज्ञही होता. तुर्की, फार्सी, अरबी व हिंदी या शिवाय त्याला उत्तम संस्कृतही अवगत होते.

भारतीय संगीताचा त्याने सखोल अभ्यास केला होता. त्याने स्वत: अनेक राग व ताल शोधून काढले. असे म्हणतात की, मृदुंगापासून तबला व वीणेपासून सतार ही वाद्ये त्याने शोधून काढली. कव्वाली हा गान प्रकार ही त्याची देणगी आहे.

त्याने अनेक भाषांमध्ये (तुर्की, फार्सी, हिंदवी(हिंदी)). जवळजवळ १०० ग्रंथ लिहिले. पण कालौघात त्यातील ४० पुस्तके सध्या उपलब्ध आहेत. त्यातील विषय साहित्य, भाषा, इतिहास, गजल, कव्वाली, हजरत निजामुद्दीन यांचा उपदेश अशा प्रकारची बहुमुखी प्रतिमा फार कमी लोकांमध्ये असते.

हिंदी भाषेतील ३५० पहेलियाँ असलेले १ पुस्तक मला दिल्लीला मिळाले. पहेलियाँ म्हणजे मराठीत ज्याला आपण उखाणा किंवा कोडी म्हणतो. अत्यंत उत्तम आणि शुद्ध हिंदीत या पहेलियाँ आहेत. त्यापैकी काहींचे स्वैर रूपांतर मराठीत करण्याचा प्रयत्न केला आहे.

- **वसंत धुपकर**, पुणे
भ्रमणध्वनी - ९१५८००७८३१

## मराठी कोडी

अमीर खुस्रोच्या हिंदी पहेलियाँची मराठी भाषांतरे.

१) विसांचा शिरच्छेद केला न एकही मेला
ना कुणाचे रक्त सांडले

२) एक पुरुष सोबत चार नार
पाचांमध्ये एकी फार, शत्रूस देती बुक्क्याचा मार

३) पुत्री अन् पिता, पुत्र अन् माता,
बहिण आणि भाऊ एकूण किती झाले भाऊ?

४) अशी गोष्ट एक सत्याची, लहान थोर सर्वच घेती
अन् चिमटीने गळा धरती

५) एक महाशय कामा पडती जितके दात तेवढी खाती
दातांनेच काम उरकती, विना दात ते काही न करिती

६) जीवामधूनी निर्जीव उपजे, निर्जीवातूनी जीव
असा कसा हा खेळ सृष्टीचा, ओळखा उखाणा गंमतीचा

७) एकच दुर्ग पण बुरुज हजार
प्रत्येकावर उभा एकेक सरदार
असा कसा हा दुर्ग घडविला
दगड, वीट ना चुना लाविला

८) अशी कशी ही म्हैस खादाड
कितीही दिले तरी खाणार
खाता खाता गाणे गाणार
तरीही न तिचे पोट भरणार

९) अजब असे हे एक झाड
तीस त्याच्या शाखा
अर्ध्या काळ्या, अर्ध्या पांढऱ्या
रात्रं दिवस विचार करा
नंतर उत्तर सांगा

१०) दिवसा उजेडी पिच्छा न सोडी
रात्री एकटे सोडून जाई
अशी कशी ग तू प्रियतमा
अदृश्य होई संकट समयी

११) दोन पाय अन् दोन डोळे
अशी सुंदरी घरोघरी
कोणी जर मधे मधे कडमडे
कट कट करूनी कापूनी काढी

१२) गोल गोल आणि गोल मटोल
नरम नरम अन् गरम गरम
अर्धे फळ अन् अर्धे फूल
ओळखा उखाणा नाहीतर व्हा गूल

१३) तीन तोंडाचा गळ्यात दोरी
असा तो महमद घोरी
अर्धा नर गिळून बसतो
लावून त्याला फाशी

१४) एक झाड असे पाहिले
अनेक मोती त्याला आले
खाली पडता पडता ते
आले तेथेच लोप पावले

- **वसंत धुपकर,** पुणे

***या कोड्यांची उत्तरे याच अंकात इतरत्र दिली आहेत.***

# आठवणींतील आनंद !

आपल्या 'संवाद'च्या ऑक्टोबरच्या अंकातील'तू तेव्हा तशी' हा लेख वाचला आणि मला ही 'टिळकरोड' शाखेतील अनेक आठवणींनी दिवसभर बेचैन करून टाकले.

ऑगस्ट १९८० पासून फेब्रुवारी १९९२ पर्यंत म्हणजे जवळ जवळ १२ वर्षे मी त्या शाखेत कार्यरत होतो.

या शाखेत काम करताना सर्वच सहकारी कर्मचाऱ्यांच्या असंख्य आठवणी तर आजही आहेतच.

शाखेमध्ये खूपच आनंदी आणि खेळीमेळीचे वातावरण असे. स्व. डिमेलो साहेबांसह इतरांबरोबर रात्री उशिरापर्यंत थांबून खेळलेला कॅरम, त्याच्या स्पर्धा, श्री पालकर साहेबांच्या काळात केलेले 'चैत्र गौरीचे' हळदी कुंकू, त्या वेळी नऊवारी साड्या नेसून आलेला स्त्री कर्मचारी वर्ग व पारंपारिक वेषातील पुरुष कर्मचारी, थंडगार पन्हे व चटकदार आंब्याच्या डाळीची चव आजही जिभेवर आहे.

शाखेत असंख्य ग्राहक तर येतच. पण लक्षात राहिलेली नावे व प्रत्यक्षात भेट झालेले प्रसिद्ध लेखक स्व.व.पु.काळे, श्री.द.मा.मिरासदार, ना.सं.इनामदार तसेच प्रसिद्ध गायिका सौ. अनुराधा मराठे, क्रिकेटपटू चंदू बोर्डे, पांडुरंग साळगावकर, खासदार रामकृष्ण मोरे इत्यादी अनेक मान्यवर शाखेत अनेकदा येत असत. त्या सर्वांशी काही ना काही बोलण्यात वा त्यांना सेवा देण्यात एक वेगळाच आनंद होता.

'वार्षिक स्नेहसंमेलन' प्रसंगी वर्षातून एकदा सर्व कुटुंबासह जेवणाचा व कर्मचारी वर्गाचा विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम असे. त्या निमित्त शाखेतच कार्यक्रम होत असत. त्या वेळचे 'जादूगार ज्यू. रघुवीरां'चे जादूचे प्रयोग, 'अमर अकबर अँथनी' हा शाखेमध्येच पडदा लावून बघितलेला चित्रपट, सौ. अनुराधा मराठे यांचे गायन इ. कार्यक्रम ठळकपणे आठवतात.

कधीही विस्मरणात न जाणारा कार्यक्रम म्हणजे या 'टिळक रोड' शाखेने सुप्रसिद्ध कवी स्व.वि.वा.शिरवाडकर उर्फ 'कुसुमाग्रजांचा' केलेला सत्कार समारंभ. केवळ शाखेची जागा कमी पडेल म्हणून हा समारंभ आम्ही 'रेणुका स्वरूप या मुलींच्या शाळे'तील सांस्कृतिक सभागृहात केला होता. त्यावेळी सजविलेले ते व्यासपीठ, रांगोळ्या, रोषणाई व पणत्या पेटवून केलेली सजावट, तात्यासाहेबांचे मोलाचे बोल आजही आनंद देऊन जातात. तसेच शाखेच्या 'रौप्य महोत्सवानिमित्त केलेला प्राध्यापक शिवाजीराव भोसले यांचा सत्कार व जीवाचे कान करून ऐकलेले त्यांचे भाषण कोण विसरेल?

असंख्य सुखद आठवणींबरोबरच काही दु:खद आठवणीही आहेत, सहकार्यांचे झालेले देहवसान, कॅश काउंटरवरूनच झालेली चोरी, पण या कटू आठवणी फारच कमी आहेत.

आजही मी जेव्हा जेव्हा शाखेत जातो तेव्हा एखाद्या खुर्चीवर ५-१० मिनिटे बसतो क्वचित एखादा निवृत्त कर्मचारी दिसतो, कधी बोलतो आणि मी पुन्हा पुन्हा असंख्य आठवणींमध्ये रमून जातो.

आज 'टिळक रोड' शाखेचे सर्व रूपच पालटून गेले आहे. नवनवीन तांत्रिक गोष्टींनी, झगमगाटी दिव्यांनी, आकर्षक काऊंटर, रंगसंगती, पडदे, पाट्या, फर्निचरने सर्व शाखा उजळून निघाली आहे. फक्त एका कोपऱ्यात त्या वेळीही असलेली 'दत्तमहाराजांच्या फोटो'ची जागा मात्र आहे तीच आणि तेथेच आहे.

म्हणूनच तेव्हा तू तशी.... आणि आता .... कशी?

- **बाळ मराठे**, पुणे

भ्रमणध्वनी - ९८२२३२९७७०

# सांज

*(चाल : एक फुलले फूल)*

संधिकाली जीवनाच्या
या दिशा अंधारल्या
लांबल्या त्या सावल्या ॥
सोबतीचे कुणी प्रवासी
पुढती जाऊन पोचले
हात आणि साथ सोडून
कोण मागे राहिले
पायतळीच्या पायवाटा मूक साऱ्या जाहल्या
जीव थकला देह शिणला
प्राण हा व्याकूळला
एकटा मी हा प्रवासी
दूर क्षितिजी चालला
तिमिर भरला आसमंती सूर्य अस्ता चालला
दाटला काळोख भवती
चांदणी नभी उगवती
चालतो मी अजून तरीही
वाट नाही संपली
पैलतरी लौकरी मज पोचता येईल का?

- **आर. जी. कडवेकर**, सातारा

दूरध्वनी - २५१५७६

व्यक्तिमत्त्व

# संत सुलभाबाई

वर्षभरा पूर्वीची गोष्ट. सुलभाच्या मुलीचं 'मेघना'चं पुण्यात लग्न होतं म्हणून आम्ही १०/१२ मैत्रिणी स्पेशल गाडी करून ठाण्याहून गेलो. बघतो तर काय, बँकेतून व्हि.आर.एस. घेतल्यानंतर लापता झालेले एकूण एक तिथे आवर्जून हजर होते. मंडळी पार सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, गुहागरपासून आली होती. ज्याच्या त्याच्या तोंडी एकच वाक्य..... ''सुलभाच्या मुलीचं लग्न, न येऊन कसं चालेल?'' आमच्या या जगन्मैत्रिणीचा हा मेळा जसा थक्क करणारा तसंच तिने प्रत्येकाशी जोडलेलं नातंही अवाक करणारं!

दुसऱ्याला काहीबाही देताना या बाईंचा हात एवढा सढळ की 'ही कर्णाची वंशज असावी' यावर आमचं एकमत. लग्नात तर तिने बाकी देवघेवीबरोबर ज्या मैत्रिणींच्या आया हयात आहेत त्यांना देखील साड्या घेतल्या आणि त्यांच्या घरी जाऊन पाया पडून हातात दिल्या. या द्यायच्या साड्या घेतानाही कोण फक्त कॉटन नेसतं किंवा कोणाला सिल्क आवडतं तर कोणाचं जरतारीवरचं प्रेम या गोष्टी मनात ठेवूनच तिच्या खरेदी पार पडल्या.

एखाद्याच्या घरी सहज जातानाही त्या घरातील मुलांना वा मोठ्यांना काय आवडतं ते लक्षात ठेवून 'नेमकं' तेच घेऊन जाण्यासाठी वेळेला ती दहा दुकानं पालथी घालेल कारण एकच... समोरच्याच्या आनंदातच हिचा परमानंद. परिवारातील कोणाच्या चेहऱ्यावर, मुलीचं लग्न, मुलाचं शिक्षण किंवा गंभीर दुखणं... अशा मोठ्या खर्चाच्या काळजीचं सावट दिसलं की हिचा हात पहिला पर्सकडे जाणार. वेळेला स्वत:ची बँकेतली 'फिक्सची रिसिट' मोडायला लागली तरी बेहत्तर ''पण भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे...'' म्हणत ती आधाराला उभी राहणारच. तिची ही दयाळू, दानशूर वृत्ती पाहून कधी कधी आमची आम्हालाच लाज वाटते.

प्रेम, कणव हे तर तिच्या धमन्यातूनच वाहत असावं. तिच्याकडे धुण्याभांड्याचं काम करणारी बाई वरचेवर आजारी पडे. या पाठचं कारण शोधता शोधता हिच्या लक्षात आलं की, ती बाई दिवसभर उपाशीपोटीच कामाचा गाडा उपसायची. त्या दिवसापासून गेली १२/१३ वर्ष घरातल्यांच्या बरोबरीनं दुपारी तिचं पान वाढलं जातंय. एखाद दिवस भाजी थोडी असली तर ही लोणचं, चटणीशी जेवेल पण त्या कष्टकरणीचं पोट भरलं पाहिजे हा नेम. आमचं तर तिच्यापाशी नेहमीचं टुमणं असतं... 'तुझ्याकडे व्हेकन्सी झाली की आमचा क्लेम लक्षात ठेव म्हणून.'

आपल्या ध्यानीमनीही येणार नाहीत अशा गोष्टी हिला सहज सुचतात. एकदा माझं तिच्याकडे काही अर्जन्ट काम होतं. पण ती राहते त्या चौथ्या मजल्यावर चढून जाण्याइतका वेळ नव्हता म्हणून तिला खाली उतरून रिक्षापाशी ये म्हटलं तर येताना बाईसाहेब डब्यातून दोन डिंकाचे लाडू घेऊन खाली उतरल्या. एक मला आणि दुसरा त्या रिक्षावाल्याला... तो ही बिचारा सकाळपासून रिक्षा चालवून दमला असेल ना!

तिच्या व माझ्या मैत्रीचे धागे कसे जुळले ते एक कोडंच आहे. कारण बँकेत असताना आम्ही कधीही एकत्र काम केलेलं नाही. पण जसं गुळाला मुंगळे चिकटतात तसं 'जो कोणी तिच्या गुरूत्वाकर्षण कक्षेत येतो तो तिच्याभोवती फिरत राहतो.

या कामधेनूचा प्रसाद मला अनेकदा मिळालाय. माझे मिस्टर एका दुर्धर व्याधीशी झगडत होते तेव्हाची एक ओली आठवण... श्रावणातल्या एका शुक्रवारी उजाडता उजाडता तिचा फोन आला.. ''आज तू सवाष्ण म्हणून जेवायला ये, मी नवस बोललेय तुझ्यासाठी.'' कसं जावं हा विचार मनात येईपर्यंत दुसरा फोन... ''त्यांना एकटं ठेवून येऊ नकोस, मीच डबे घेऊन येते... जरा जास्तच आणते... संध्याकाळी पण तुला काही करायला नको'' आणि नंतर थोड्या वेळाने ही अन्नपूर्णा आपल्या वजनापेक्षाही जड असे डबे घेऊन दु. १२ वाजता दारात हजर.

जिथे जिथे गरज असेल तिथे तिथे जेवणाखाणाचे डबे पोहचवणे ही हीची सुखाची व्याख्या. या पुण्यकर्मात तिच्या जोडीदाराचा म्हणजे विलास आरोसकर यांचा निम्मा वाटा. 'तिने डबे बनवायचे आणि नवऱ्याने ते ती म्हणेल तिथे पोहचवायचे' हा यांचा सत्संग. आम्ही सर्वांनी या दोघांना 'डबेवाले आरोसकर' ही उपाधी बहाल केलीय. बरं दुसऱ्यासाठी चांगलंचुंगलं करून स्वत:ही खाईल तर तसंही नाही. कारण प्रकृती तोळामासा. पाहुण्यांसाठी 'मटणवडे' करायचे आणि स्वत:साठी फिकी 'मूगडाळ खिचडी' टाकायची असला प्रकार. एवढंस खाऊन हा जीव एवढी उर्जा कुठून आणतो हा आम्हाला पडलेला एक अनुत्तरीत प्रश्न आहे.

बँकेत काम करताना तर अशक्तपणाने 'सलाईन' लावण्याची वेळ तिच्यावर अनेकदा आलीय. गंमत म्हणजे या गोष्टीसाठी सारखं सारखं हॉस्पिटलमध्ये ॲडमिट व्हायला नको म्हणून त्यावेळी तिने घरीच सगळी व्यवस्था करून ठेवली होती. तिचा दुसरा जीवलग म्हणजे 'बाम'. आम्ही एकमुखाने एक ठराव पास केलाय तो असा.. सुलभा जर निवडणुकीला उभी राहिली तर 'तिची निशाणी म्हणजे एकतर सलाईनची बाटली नाहीतर बाम.'

ऐसी कळवळ्याची जाती तिथे लाभावीण प्रीती... अशी आमची ही मैत्रिण 'सासरमाहेरचा' आधारवड झाली नाही तरच नवल. लहान वयात 'वैधव्य' आलेल्या आपल्या नणंदेच्या पुनर्विवाहासाठी तिने जो आटापिटा केलाय तो बघताना आमच्याच पोटात तुटायचं. आज तिच्या या नणंदेचा 'सावत्र

मुलगा’ देखील आपल्या या लाडक्या मामीला अमेरिकेहून फोन करून आपलं मन मोकळं करतो, यात सर्व काही आलं. सुलभाच्या सासूसासऱ्यांकडे तर स्वत:चं असं काहीही नव्हतं. तरी पण सासूबाईंच्या देण्याचा हात ओळखून हिने त्यांना सुरवातीलाच सांगून टाकलं की, ‘‘हे बघा या कपाटात समोरच पैसे ठेवलेत, तुम्हाला कुणाला काही द्यावंसं वाटलं तर यातून खुशाल खर्च करा. त्या पैशाचा हिशेब नाही.’’

बँकेत काम करताना तिथला सेवक वर्ग, झाडूवाला, कॅन्टिन बॉय यांच्याकडे तिचं विशेष लक्ष. आपल्या बँकेच्या ठाणा शाखेत ‘घाडीगावकर’ नावाचा एक हरहुन्नरी शिपाई होता. पगाराचा पैसा पुरेना म्हणून त्याने सुतारकामाचा जोड व्यवसाय करायचं ठरवलं. पण पहिल्या ऑर्डरचं रिस्क कोण घेणार? अशा वेळी ‘कमी तिथे आम्ही’ हे ब्रीद जपणारी आमची सुलभा पुढे आली. तिचं हे ऋण त्याने कायम मानलं, मिरवलं.

‘मृदुला चौबळ’ हे नाव घेतल्याशिवाय ‘सुलभापुराण’ संपूच शकत नाही. दोघींच्या मुली बालवाडीपासूनच्या मैत्रिणी. त्यातून यांच्या मैत्रिचेही धागे जुळले. ही वीण पुढे एवढी घट्ट झाली की त्या हक्कातून सुलभाने आपल्या या मैत्रिणीचा विस्कटणारा संसारही सावरला. पुढे ती स्वावलंबी व्हावी म्हणून तिच्यातील पाककौशल्य हेरून ते उपयोगात आणण्यासाठी तिला उत्तेजन दिलं. एवढंच नव्हे तर तिने केलेल्या पदार्थांचं बँकेच्या सर्व शाखात जोरदार मार्केटिंगही केलं. आज आपल्या सुखी संसाराचं श्रेय ‘सुलभाला’ देताना ‘मृदुलाचा’ घसा दाटून येतो.

टेलिफोन हा सुलभाचा वीक पॉईंट. तिचा दिवसभरातील निम्म्यापेक्षा जास्त वेळ फोनवर बोलण्यात जातो. बोलता बोलता ‘नको ती कामं अंगावर ओढवून घेण्याचा’ तिला सोसच आहे. एकदा आमच्या नौपाडा शाखेच्या ‘दांडेकर साहेबांना’ कुणा ‘क्ष’ व्यक्तीचा फोन नंबर हवा होता. मी म्हटलं, ‘‘सुलभाला विचारा, तिच्याकडे दुनियाभरचे फोन नंबर असतात आणि नसल्यास ती कुठून तरी मिळवून देईल’’ आणि झालंही तसंच. दिवसभर याला त्याला फोन करत तिने एकदाचा तो नंबर मिळवून दांडेकर साहेबांना दिला तेव्हा कुठे ती सुटली. तिच्या फोनचं बील पाहून आम्हाला गरगरायला होतं पण तिच्या जोडीदाराचं म्हणणं की ‘हेच तर तिचं टॉनिक आहे....’ आणि तिचा सुखद सहवास हे आमचं टॉनिक.

‘जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती’ हे वचन तिला तंतोतंत लागू पडतं. संत जनाबाई, संत मुक्ताबाई तशी ही संत सुलभाबाई. या जन्मी केलेल्या ‘पापपुण्यावर’ पुढचा जन्म ठरतो म्हणतात. हे जर खरं असेल तर आमची ही मैत्रिण पुढच्या जन्मी ‘इंग्लंडची राणी’ होण्यात काहीच हरकत नाही, खरं ना?

**- संपदा वागळे,** ठाणे
भ्रमणध्वनी - ९९३०६८७५१२

## निमित्त



दुपारचे वाजताहेत तीन, करावा का चहा?
पण नकोच, उगीच कपबशा किणकिणतील
त्याची झोप चाळवेल
तसा सकाळ, दुपार चहा करतो तोच,
मी जागी असो नसो,
आवाज करीत मस्त कपात ओततो रोज
आत मात्र शांत कुशीवर झोपलाय
लहानुशा बाळागत
किती गं करतात कामं बरंय बाई तुझं
आमच्या ह्यांना तर साधा चहाही नाही जमत
(लाडावून का ठेवलंत?)
साऱ्याच असं म्हणतात
खरंतर, त्याचं काम करणं, इतरांसाठी खपणं
मलाही मनापासून आवडतं
शिवाय ते वेळ जायचं साधनच कि, निवृत्तीनंतरच!
पण हे सगळं मनातल्या मनात!
खरंतर, त्याच्या आईनंच
बाळकडू त्याला पाजलेलं
हे कामं वाटून घेण्याचं
मी नुसतं निमित्त! मी नुसतं निमित्त!



**- कल्पना सुभाष कोठारे, सांताक्रुझ**
दूरध्वनी - २६१०४५५२

## गगनभेदी टाहो

हा गगनभेदी टाहो
विकलांग मातेचा
पाहूनी कलेवर
निष्प्राण देह पुत्राचा!
हे कसले जीवन?
तात दे अग्नी पूताला
अन् पुढे राही भग्न काळ अंधारला!
म्हणतसे हो उलटी वाहे हो गंगा
प्रभो! आता राहणे कोणासाठी?
की आठवणींच्या हिंदोळ्यावर
जगण्यासाठी?
अन् आधाराची काठी होऊन
पिलांचे अश्रू पुसण्यासाठी?

**- अरविंद जोशी,** सांगली
भ्रमणध्वनी - ९३२५४१९३२५

## नेताजी खड्डेराव

*(चाल : एका तळ्यात होती)*

एका रस्त्यात होते, खड्डे किती अनेक
होता सखोल रूंद, खड्डा तयात एक ॥धृ॥

खड्डे बुजवून टाकू, होते दिले वचन
निवडून आल्यावरी, वचना गेले भूलून
खड्ड्याची आठवण, नेत्यास ना क्षणिक
मतदार झोपलेला, त्याचा न त्यास धाक
सदैव त्यांची शैली, भाषणी वचने ऐक
वचनांकडे तयांची, होतसे डोळेझाक

गेले निघून वर्ष, झाले निराश लोक
लावून पाटी लिहिले, त्यावर नाव एक
नेत्याचे नाव दिले, खड्ड्यास रूंद मोठ्या
बक्षीस हेच त्याच्या, वागणुकीस खोट्या
वाचून जात होते, ते नाव सारे लोक
तेथून हसत जाती, म्हणती झाला जोक

वाहन मार्गावरून, धावावे निर्विरोध
खड्ड्याचे मात्र काम, गतीस लावी रोध
नेत्याचे नाम शोभे, खड्ड्यास मोठ्या ऐशा
प्रगतीस रोध लावी, नाटकी मुखी भाषा
ठरविले जनतेने, काम करू या चोख
निवडणूकीत येत्या, नेत्याचे कापू नाक

**- पी. एम. भगत**
भ्रमणध्वनी - ९९६७३१५७८३

## वाह क्या बात है!

* खुर्चीत ताठ बसावे .
  बाक येत नाही.
* गैरहजर मुलांची जो योग्य हजेरी घेतो
  तो खरा शिक्षक
* कविता पाठ नव्हती, शिक्षा झाली
  आणि मला चांगलाच धडा मिळाला

## आम्ही खवैये/लढवय्ये

नाद खुळा करू नका आम्हाशी आम्ही कोल्हापुरी
तांबडा, पांढरा मटण खर्डा, झुणका अन् भाकरी ॥१॥

गंगावेशी देती म्हशी, दुर्मिळ धारोष्ण दूध
बदाम पिस्ते शेंग गुळाची, आबादी आबाद ॥२॥

लाल मातीत रमतो आम्ही, मस्तीत कुस्ती करतो
आखाड्यात दमतो आम्ही, मैदाने गाजवितो ॥३॥

सत्पालाला चितपट करण्या जिद्द आमची होती
गणपती, मारूती, श्रीपती आणि अजूनही नावे किती ॥४॥

राष्ट्रकेसरी हिंद केसरी, केसरी आम्ही झालो
शानदार मानाची चांदीची, गदा घेऊन आलो ॥५॥

थाप आमच्या पाठीवरती, श्री शाहू छत्रपतींची
शर्थ करून शान राखितो, करवीर नगरीची ॥६॥

मर्द मराठा तेवत ठेवील, आखाड्यांचे धडे
इतिहासाची साक्ष ठेवुनी, पाऊल पडते पुढे ॥७॥

**- प्रभाकर कानिटकर,** कोल्हापूर
भ्रमणध्वनी - ९८८११९९१९९

## प्रतिभेच्या कला

संगीताच्या तालावर, काव्य करतं पदन्यास
थिरकत्या पावलांना असते, वाद्यांच्या साथीची आस
वादकांच्या बोटातून, सूर-चित्र येते उदयाला
त्या चित्रात प्राण फुंकतो, तानांचा सप्तरंगी कुंचला
त्या सुंदर चित्रातले रंग, मनात अलगद उतरतात
मनातल्या रंगीत कल्पना, कागदावर आकार घेतात
आकारातून मग त्या, सुंदरसे शिल्प निर्माण होते
शिल्पावरची प्रतिक्रिया, शब्दांमधून ओघळते
शब्दांच्या साथीने फुलतो, चेहऱ्यावरचा अभिनय
अभिनयातून उमटतात, हर्ष, राग, अनुनय
खरंच का असतात, ह्या कला वेगवेगळ्या?
की एकाच प्रतिभेच्या, त्या आहेत छटा आगळ्या?

**- उज्वल र. ब्रम्हांडकर, विरार**

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. PNCW/M-144/2011-2013 Dated 10.12.2010
Licence to post at Market Yard P.S.O. on 25th of each Month

## वास्तव

श्रीमंतांच्या वस्तीत राहून श्रीमंत होता येत नसतं
म्हणतात पैशाचं सोंग आणणं सोपं नसतं
सिंहाचं कातडं पांघरून शेळीला सिंह होता येत नसतं
कावळ्याला धवल रंग फासून बगळा बनता येत नसतं
अपेक्षांचं स्वप्न कधी पाहायचं नसतं
कारण अपेक्षाभंगाचं दुःख फार मोठं असतं
गोष्टीतला ससा खरा नसतो कासव खरं असतं
धीरे धीरे आपल्या ध्येयाकडे पोहोचलेलं असतं
जीवनात संकटे आली तर धीरानं घ्यायचं असतं
अंगावर झेलून वाट चालणं आपल्या हाती असतं
जे मिळतं त्यात सुखी रहायचं असतं
आणि हेच जीवनाचं वास्तव असतं

**- सौ. मीना अशोक शेवडे,** मुंबई
भ्रमणध्वनी - ९९२०७७५२०५

## भोवरा

आर्त भाव डोळ्यातील माझिया
नाही कधी रे तुला समजले
शब्द उमलले ओठांवरती माझ्या
थकूनी भागूनी तिथेच विरले होते

फुलपाखरे मनातील माझिया
कधीच नाही तुला का रे दिसली?
फुले सुगंधी तुझ्यासाठी वेचलेली
ओंजळीत माझिया सुकून गेली

अजूनही खोट्या आशेवरती
काटे वेचीत आयुष्य मी जगते
दूर कुठूनी तुझी चाहूल येता
भूतकाळाच्या भोवऱ्यात मी वाहून जाते

- दिलीप अ. रेडकर
गोरेगाव (प)
मुंबई

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.